RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

**दि. १० मे 2026**



1938- नागपूर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.
1943- इंडियन फेडरेशन ऑफ लेबर, मुंबई तर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा सम्मान.
स्वाभिमान दिन संकलन प्रा. यशवंत दुपटे

रविवार, १० मे २०२६ | वर्ष : ६ | अंक : १३० | दैनिक | किंमत : ₹५/-
Sunday, 10 May 2026 | Year : 6 | Issue : 130 | Daily | Rate: Rs. 5/-

# धर्मांतर कायदा रोखण्यासाठी न्यायालयीन लढाईपेक्षा रस्त्यावरची लढाई आवश्यक : ॲड. फिरदौस मिर्झा



**नागपूर :** महाराष्ट्रात प्रस्तावित असलेल्या महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य अधिनियम 2026 विरोधात व्यापक जनआंदोलन उभारण्याची गरज असून, हा कायदा संविधानाने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारा असल्याचा आरोप मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाचे वरिष्ठ अधिवक्ता ॲड. फिरदौस मिर्झा यांनी केला. राज्यपालांची स्वाक्षरी होईपर्यंत या कायद्याला न्यायालयात आव्हान देता येत नाही. त्यामुळे हा कायदा रोखण्यासाठी न्यायालयीन लढाईपेक्षा रस्त्यावरची लढाई लढावी लागेल, असे ते म्हणाले.

काष्ट्राईब महासंघ तसेच भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, संविधान परिवार, राष्ट्रीय संयुक्त मोर्चा आणि विविध संघटनांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, उर्वेला कॉलनी येथे आयोजित महाराष्ट्र धर्म परिवर्तन ॲक्ट 2026 व वंचित समूहावर होणारे परिणाम या विषयावरील जाहीर चिंतन सभेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एन. व्ही. ढोके होते. व्यासपीठावर अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे जगजीतसिंग, गांधीवादी विचारवंत प्रा. विजय बारसे, भन्ते पय्यासिरी, भारतीय बौद्ध महासभेचे इंजि. पद्माकर गणवीर, मचर्मकार महासंघाचे लीलाधर कानोडे, काष्ट्राईब महासंघाचे अध्यक्ष अरुण गाडे तसेच संविधान परिवारचे प्रा. राहुल मुन उपस्थित होते.

ॲड. मिर्झा पुढे म्हणाले की, देशाच्या फाळणीच्या काळात श्यामाप्रसाद मुखर्जी आणि इतर नेत्यांनी अल्पसंख्याक समाजाला धर्माचे आचरण, प्रचार व प्रसार करण्याचा अधिकार मिळावा यासाठी पुढाकार घेतला होता. त्यानुसार संविधानाच्या कलम 26 अंतर्गत धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्यामुळे या मूलभूत अधिकारांच्या विरोधात जाणारा कोणताही कायदा रद्द करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. अध्यक्षीय भाषणात एन. व्ही. ढोके यांनी अनुसूचित जातींना सामाजिक गुलामगिरीत ठेवण्याच्या उद्देशानेच धर्म परिवर्तनविरोधी कायदे आणले जात असल्याचा आरोप केला. या कायद्याविरोधात अरुण गाडे यांच्या नेतृत्वाखाली संघर्ष समिती स्थापन करून तीव्र आंदोलन उभारण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे जगजीतसिंग यांनी जे लोक आमच्या अधिकारांचे हनन करतात, तेच संविधानविरोधी आहेत. धर्मांतर कायद्याचा वापर करून आम्हाला धमकावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचे प्रयत्न हाणून पाडले पाहिजेत, असे ठामपणे सांगितले. प्रा. विजय बारसे यांनी या कायद्याचा मसुदा पोलीस महासंचालकांकडून तयार करण्यात आल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करत सरकारची भूमिका हुकूमशाहीची असल्याचा आरोप केला. या विरोधात तीव्र आंदोलन उभारण्याचे आवाहन त्यांनी केले. भन्ते पय्यासिरी यांनी धर्म परिवर्तन कायदा रद्द करायचा असेल तर धर्मांतराची चळवळ दुप्पट वेगाने वाढवा, असे आवाहन केले. भारतीय बौद्ध महासभेच्या वतीनेही या कायद्याला विरोध दर्शविण्यात आला असून, रस्त्यावर उतरून एकजुटीने संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रा. रमेश पिशे, ज्ञानेश्वर रक्षक, श्यामराव हाडके, भीमराव फुसे, कॉ. राजेंद्र साठे, भीम आर्मीचे बागेश्वर, बापू खोब्रागडे, संजय रामटेके, राजेश ढेंगरे, मुकुंद मेंढे, गंगाधर कांबळे, रुबेन फ्रांन्सिस, विशाल आर्यबोधी, प्रा. हृदय चक्रधर, ॲड. रमेश राठोड आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची भूमिका अरुण गाडे यांनी मांडली. संचालन प्रा. राहुल मुन यांनी केले तर आभारप्रदर्शन कवी शालिक जिल्हेकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला एम. एस. जांभुळे लिखित गीत मनीषा मुनघाटे आणि मंगला जांभुळे यांनी सादर केले.

सभेत विविध प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून ते शासनाकडे पाठविण्यात येणार आहेत. तसेच लवकरच मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती अरुण गाडे यांनी दिली.

## भारताने 'अग्नी'ची MIRV तंत्रज्ञानासह घेतली यशस्वी चाचणी



**नवी दिल्ली :** भारताने 8 मे रोजी ओडिशामधील डॉ. एपीजे अब्दुल कलाम बेटावरून 'मल्टिपल इंडिपेंडंटली टार्गेटेबल री-एन्ट्री व्हेईकल' (MIRV) तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या प्रगत 'अग्नी' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. यामुळे एकाच क्षेपणस्त्राने शत्रूचे अनेक तळ उद्ध्वस्त होणार आहे. या क्षेपणास्त्राची एकापेक्षा जास्त 'पेलोड्स'सह चाचणी करण्यात आली. हिंदी महासागर क्षेत्रातील मोठ्या भौगोलिक परिसरात विखुरलेल्या वेगवेगळ्या लक्ष्यांवर हे पेलोड्स अचूकपणे डागण्यात आले. जमिनीवरील आणि जहाजांवरील अनेक स्थानकांद्वारे क्षेपणास्त्राच्या प्रक्षेपणापासून ते लक्ष्यावर आदळण्यापर्यंतच्या संपूर्ण मार्गाचा मागोवा घेण्यात आला.

या चाचणीची सर्व उद्दिष्टे यशस्वीरित्या पूर्ण झाल्याची पुष्टी उड्डाण विदा द्वारे करण्यात आली आहे. या यशस्वी चाचणीमुळे भारताने एकाच क्षेपणास्त्र प्रणालीद्वारे अनेक सामरिक लक्ष्यांना भेदण्याची आपली क्षमता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. या क्षेपणास्त्राची निर्मिती संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या (DRDO) प्रयोगशाळांनी देशभरातील उद्योगांच्या सहकार्याने केली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या यशाबद्दल DRDO, भारतीय सैन्य आणि संबंधित उद्योगांचे अभिनंदन केले. वाढत्या धोक्यांच्या पार्श्वभूमीवर, ही चाचणी भारताच्या संरक्षण सज्जतेत प्रचंड भर घालेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## अनिल अंबानींच्या कंपन्यांवर छापे





**मुंबई :** केंद्रीय अन्वेषण ब्युरोने (CBI) देशाच्या बँकिंग क्षेत्राची आणि भारतीय आयुर्विमा महामंडळाची (LIC) 27,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची फसवणूक करणाऱ्या कथित घोटाळ्याप्रकरणी मोठी कारवाई केली आहे. शनिवारी, अनिल अंबानी यांच्या नेतृत्वाखालील रिलायन्स एडीए ग्रुपच्या कंपन्या आणि संचालकांविरुद्ध मुंबईतील 17 ठिकाणी छापे टाकण्यात आले. ही कारवाई कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि बँक निधीच्या अपहाराच्या मोठ्या प्रकरणांवर तपास यंत्रणेची कठोर भूमिका दर्शवते.

सीबीआयच्या प्रवक्त्यानुसार, रिलायन्स टेलिकॉम लिमिटेड, रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड आणि रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड आणि त्यांच्या संचालकांविरुद्ध दाखल असलेल्या तीन वेगवेगळ्या प्रकरणांअंतर्गत ही शोध मोहीम राबविण्यात आली. तपास यंत्रणेने या कंपन्यांच्या संचालकांच्या निवासस्थानांवर छापे टाकले. यासोबतच, ज्या मध्यस्थ कंपन्यांच्या खात्यांचा वापर बँकेच्या निधीचा अपहार (फेरफार) करण्यासाठी केला जात असल्याचा आरोप आहे, त्यांच्या कार्यालयांचीही झडती घेण्यात आली.

शुक्रवारी मुंबईतील विशेष न्यायालयातून शोध वॉरंट मिळाल्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली, ज्यामध्ये अनेक गुन्हेगारी स्वरूपाचे दस्तऐवज जप्त करण्यात आले.

27,337 कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान आणि घोटाळा या कथित घोटाळ्याचा आर्थिक परिणाम प्रचंड आहे. अधिकाऱ्यांच्या मते, या प्रकरणांमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि भारतीय राष्ट्रीय विमा महामंडळ (LIC) यांना एकत्रितपणे अंदाजे 27,337 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. तपासात हे धक्कादायक सत्यही उघड झाले आहे की, निधी वळवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक मध्यस्थ कंपन्या एकाच पत्त्यावरून कार्यरत होत्या.

सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण आणि आतापर्यंत केलेली कारवाई सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि एलआयसीकडून आलेल्या तक्रारींच्या आधारे, केंद्रीय तपास यंत्रणेने अनिल अंबानींच्या रिलायन्स ग्रुपविरोधात हजारो कोटी रुपयांच्या कथित फसवणुकीचे एकूण सात गुन्हे दाखल केले आहेत. या गुन्ह्यांची नोंद झाल्यानंतर लगेचच, सीबीआयने गेल्या काही महिन्यांत इतर 14 ठिकाणीही शोधमोहीम राबवली आहे.

## भाजप आमदाराच्या 'पीए'ची विभागीय वन अधिकाऱ्याला धमकी

**चंद्रपूर:** भाजपचे आमदार कीर्तीकुमार उर्फ बंटी भांगडिया यांचे स्वीय सहायक (पीए) महेश प्रेमळवार यांनी व्यवस्थापन कोट्यातील सफारी बुकिंगसाठी ताडोबा प्रकल्पाचे विभागीय वन अधिकारी सचिन शिंदे यांना ताडोबा पर्यटन माहिती केंद्रातील एका महिला कर्मचारी यांचे फोनवर अतिशय आर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून धमकी दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणाची शिंदे यांनी तक्रार केली असून व्यवस्थापन सफारीच्या जबाबदारीतून मुक्त करावे अशी मागणी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक यांच्याकडे केली आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात उन्हाळ्याच्या सुटीत पर्यटकांची मोठी गर्दी आहे. त्यामुळे सफारी बुकिंग हाऊसफुल आहे. अतिविशिष्ठ व्यक्तींसाठी तसेच मंत्री, खासदार व आमदार यांच्यासाठी ताडोबा सफारी बुकिंगसाठी व्यवस्थापन कोटा आहे. त्याची जबाबदारी ताडोबाचे विभागीय वन अधिकारी सचिन शिंदे यांच्याकडे आहे. चिमूर विधानसभा मतदार संघाचे भाजपचे आमदार कीर्तीकुमार उर्फ बंटी भांगडिया यांचे स्वीय सहायक महेश प्रेमळवार यांनी 7 मे रोजी व्यवस्थापन कोट्यातील सफारी बुकिंगसाठी ताडोबा पर्यटन माहिती केंद्र येथील एका महिला कर्मचारीला फोन केला. यावेळी प्रेमळवार आणि महिला कर्मचारी यांच्यात शाब्दिक वाद झाला. तेव्हा प्रेमळवार यांनी महिला कर्मचारी तसेच विभागीय वन अधिकारी सचिन शिंदे यांना फोनवर अतिशय आर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून धमकी देऊन शासकीय कामात अडथळा आणला. या सर्व प्रकारामुळे शिंदे यांच्या नैतिक धैर्यावर मोठा परिणाम झाला असून ते कमालीचे अस्वस्थ झाले आहेत.

## आपच्या मंत्र्याला 100 कोटींच्या घोटाळ्यात ईडीकडून अटक



**चंदिगड :** अंमलबजावणी संचालनालयाने (ED) शनिवारी (9 मे) पंजाबचे मंत्री आणि आम आदमी पक्षाचे ज्येष्ठ नेते संजीव अरोरा यांना अटक केली. मोबाईल फोनची खरेदी आणि निर्यातीशी संबंधित मोठ्या प्रमाणावरील मनी लॉँड्रिंग आणि बनावट जीएसटी बिलिंग प्रकरणाच्या संदर्भात आठ तासांहून अधिक काळ झाडाझडती घेतल्यांनतर ही कारवाई करण्यात आली.

दिल्ली, गुरुग्राम आणि चंदीगडमधील पाच ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले. यामध्ये 'हॅम्प्टन स्काय रिअल्टी लिमिटेड'चे कार्यालय आणि मंत्र्यांशी संबंधित मालमत्तांचा समावेश होता. संजीव अरोरा यांनी आपल्या कंपनीच्या माध्यमातून 100 कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या मोबाईल फोनची बनावट जीएसटी खरेदी दाखवली असल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. या व्यवहारांचा वापर करून दुबईतून बेकायदेशीर पैसे भारतात आणल्याचा (राउंड ट्रिपिंग) संशय ईडीने व्यक्त केला आहे. तपासादरम्यान अरोरा यांनी सहकार्य केले नसल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. त्यांना न्यायालयात हजर करून ईडी त्यांची कोठडी मागणार आहे.

आज सकाळपासून पंजाबचे मंत्री संजीव अरोरा यांच्या निवासस्थानी ईडीचे छापे सुरू आहेत. देशात मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून सीबीआय आणि ईडी अनुक्रमे भ्रष्टाचार आणि मनी लॉँडरिंग थांबवण्यासाठी नव्हे, तर इतर पक्ष फोडण्यासाठी आणि इतर राजकीय नेत्यांना धमकावून त्यांना भाजपामध्ये सामील करून घेण्यासाठी काम करत आहेत. संजीव अरोरा यांच्यावरील छापा हे त्याच दिशेने उचललेले पाऊल आहे, असा आरोप आपचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी केला.

तर पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी भाजपावर केंद्रीय यंत्रणांचा राजकीय शस्त्र म्हणून वापर केल्याचा आरोप केला. निवडणुका जवळ आल्या की अशा कारवाया वाढतात आणि आता पंजाब भाजपाच्या निशाण्यावर असल्याचे त्यांनी म्हटले.

## जाईबाई चौधरी ज्ञानपीठातील 10 विद्यार्थ्यांना पाली विषयात 100 पैकी 100



**नागपूर :** स्थानीय जाईबाई चौधरी ज्ञानपीठ, मंगळवारी बाजार, सदर, नागपुर येथे नुकत्याच दहावी बोर्ड परीक्षेत 21 विद्यार्थ्यांनी प्रावीण्य प्राप्त केले. जागतिक युद्धाच्या काळात विश्वाला मैत्री, करुणा, समानता, मानवता अशा जीवन मूल्यावर आधारित मार्गाची नितांत आवश्यकता असताना तो धम्ममार्ग विश्वाला सांगणाऱ्या धम्म भाषेचे शिक्षण पाली विषयातून प्राप्त होते. जुन्या काळी पाली भाषा ही लोकभाषा म्हणून प्रख्यात होती, या पाली विषयात जाईबाई मधील अगदी 10 विद्यार्थ्यांनी 100 पैकी 100 गुण घेऊन तरुणाईला एक नवीन शैक्षणिक संदेश दिला. मिताली मदने 91.80त्न, आदर्श भांगे 91.60त्न, संकल्प गणवीर 91.60त्न यांनी कुठल्याही शिकवणी वर्गाशिवाय घवघवीत यश प्राप्त केले तसेच ज्ञानपिठात 11 विद्यार्थ्यांनी 80त्न च्या वर गुण घेऊन शाळेच्या नावलौकिकतेत भर घातली.

अनेक वर्षापासून पाली आणि ध्यानाचे शिक्षण देणारे संस्थेचे सचिव आचार्य सुधाकर चौधरी सर यांनी सदर विद्यार्थ्यांचे मैत्री भावनेसह अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले. ज्ञानपीठात 1993 पासून पालीमध्ये 100 पैकी 100 गुणांची ही परंपरा विद्यार्थ्यांनी कायम ठेवली. पालीच्या शिक्षिका अश्विनी गणवीर तसेच शंभर पैकी शंभर गुण मिळविणारे विद्यार्थी मिताली मदने, आदर्श पवार, संकल्प गणवीर, हेमंत मुसळे, याशिका आगासे, सिया खंडाळे, सुमन चंद्रवंशी, यशस्वी लोणारे, क्रिश कावळे, नादिया शहारे यांच्या यशासाठी संचालिका प्रभा चौधरी व प्राचार्या अर्शिया पठान तसेच सर्व शिक्षकांनी शुभेच्या व्यक्त केल्या.

## तमिळनाडूत सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा



**चेन्नई :** तमिळनाडूमध्ये सरकार स्थापन करण्याच्या मार्गातील विजय यांच्यासमोरील शेवटचा अडथळा दूर झाला आहे. थोल थिरुमावलवन यांच्या नेतृत्वाखालील 'व्हीसीके'ने शनिवारी विजय यांच्या टीव्हीके पक्षाला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. टीव्हीकेने आता कॉंग्रेस, सीपीआय, सीपीआय(एम), आययुएमएल आणि व्हीसीके यांच्या पाठिंब्यामुळे 118 चा बहुमताचा आकडा ओलांडला असून, युतीचे संख्याबळ आता 120 वर पोहोचले आहे. यामुळे विजय यांचा सत्तास्थापनेचा मार्ग अखेर मोकळा झाला असून, बहुमताअभावी रद्द करण्यात आलेला शपथविधी आता लवकरच होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विदुथलाई चिरुथाईगल कच्ची (व्हीसीके) ने तमिळनाडूमध्ये सरकार स्थापनेसाठी पाठिंबा दिल्याची घोषणा टीव्हीकेचे नेते आधव अर्जुन यांनी केली आहे. आययुएमएलने देखील टीव्हीकेला पाठिंबा दिला आहे, यामुळे आता युतीचे संख्याबळ 120 एवढे झाले आहे. शुक्रवारी व्हीसीकेच्या नेत्यांची उच्चस्तरीय बैठक पार पडली, या बैठीत विजय यांना पाठिंबा देण्याबाबत थिरुमावलवन यांच्याकडून घोषणा करण्यात आली. या पाठोपाठ इंडियन युनियन मुस्लिम लीग (आययुएमएल) यांच्याकडून देखील टीव्हीकेला पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे.

## मारेगाव ग्रामीण रुग्णालयात व्हेंटिलेटर आणि मूलभूत सुविधांचा अभाव

# 'द प्लॅटफॉर्म'च्या रिट याचिकेवर उच्च न्यायालयाची राज्य शासनास नोटीस

**नागपूर/मारेगाव :** यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव येथील ग्रामीण आरोग्य यंत्रणेचा भीषण पर्दाफाश झाला असून, 1 लाख लोकसंख्या असलेल्या या आदिवासीबहुल भागात वर्षानुवर्षांपासून व्हेंटिलेटर आणि मूलभूत सुविधांचा गंभीर अभाव असल्याचे वास्तव समोर आले आहे. या प्रश्नावर 'द प्लॅटफॉर्म फॉर जस्टिस अँड ह्युमन राईट्स' या संघटनेचे सदस्य ॲड. साहिल शेख आणि ॲड. इंजि. राजीव खोब्रागडे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल केली असून, न्यायालयाने 7 मे 2026 रोजी राज्य शासनाला 29 जूनपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. माहिती अधिकारात मिळालेल्या पुराव्यानुसार, मारेगाव रुग्णालयात व्हेंटिलेटरची संख्या 'शून्य' असून 3 लाख रुपयांचे डिझेल देयक थकीत असल्याने आपत्कालीन जनरेटरही बंद पडले आहे, ज्यामुळे वीज खंडित झाल्यास सर्व तांत्रिक तपासण्या ठप्प होतात.

रुग्णालयाची इमारत 1950-70 मधील असून ती आता जर्जर झाली आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात दिलेल्या Article 21 अंतर्गत 'आरोग्य' हा जगण्याच्या अधिकाराचा अविभाज्य भाग आहे. मात्र, Article 47 अन्वये सार्वजनिक आरोग्य सुधारण्याचे राज्याचे कर्तव्य असतानाही प्रशासनाने याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. मारेगाव परिसरातील विकासाप्रती शासनाची ही 'बेरुखी' जुनीच असून, यापूर्वीही 'द प्लॅटफॉर्म' संघटनेने बसस्थानकाच्या प्रश्नावर मानवाधिकार न्यायालयात धाव घेतली होती. तब्बल 30-40 वर्षांपासून प्रलंबित असलेल्या बसस्थानकाच्या प्रश्नावर संघटनेने कायदेशीर लढा देऊन 50 लाख रुपयांचा निधी मंजूर करून घेतला होता, ज्यामुळे कामाला सुरुवात झाली होती. मात्र, आता हा निधी संपल्यामुळे काम पुन्हा रखडले असून, प्रशासन पुढील निधीच्या प्रतीक्षेत आहे. आरोग्य सेवेप्रमाणेच बसस्थानकाचेही उर्वरित काम पूर्ण होईपर्यंत संघटना आपला लढा सुरूच ठेवणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

या याचिकेत ॲड. मनीष दुबे यांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने प्रभावी युक्तिवाद केला असून या कायदेशीर लढ्यात त्यांना ॲड. साहिल शेख, ॲड. इंजि. राजीव खोब्रागडे, सामाजिक कार्यकर्ते सोहेल सय्यद आणि ॲड. निखिल मेश्राम हे सहकार्य करत आहे. आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष 29 जून रोजी होणाऱ्या सुनावणीकडे लागले आहे.

> 'व्हेंटिलेटर नसणे आणि विजेअभावी तपासण्या ठप्प होणे हा मारेगावच्या जनतेवर होणारा क्रूर अन्याय आहे. प्रशासकीय निष्काळजीपणामुळे इथल्या गरिबांचा जगण्याच्या अधिकार हिरावला जात असून, त्याविरुद्ध आमचा हा कायदेशीर संघर्ष आता शेवटच्या श्वासापर्यंत सुरु राहील.'
>
> ॲड. साहिल शेख(सदस्य - द प्लॅटफॉर्म)

> 'अनुच्छेद 21 अंतर्गत मिळणारे आरोग्य हक्क व अनुच्छेद 47 चे शासन निर्णय व त्याअंतर्गत IPHS 2022 कायदे हे केवळ कागदावर ठेवण्यासाठी नसून ते प्रत्यक्षात जनसामान्यांना मिळवण्यासाठी आमचा हा लढा आहे. शेवटच्या माणसाला मूलभूत अधिकार मिळेपर्यंत आम्ही थांबणार नाही.'
>
> ॲड. इंजि. राजीव खोब्रागडे (सदस्य - द प्लॅटफॉर्म)

PROPERTY FOR RENT/ LEASE
AVAILABLE ON RENT/ LEASE AT PRIME LOCATION
COMMERCIAL PROPERTY
Total Plot Area: 50,000 Sq.Ft.
Constructed Area: 30,000 Sq.Ft.
LOCATION: WELA (HARI), SHANKARPUR ROAD
◆ IDEAL FOR ◆
• Hostel/ Student Accommodation • New College/ Educational Institution • Residential College Campus • Car/ Motorcycle Showroom • Warehouse / Godown • Supermarket (D-Mart Type)
CONTACT
DR. KAMBLE: 9422539451

# न्यायात भेदभावाचे सूर...?




भारतीय लोकशाहीची सर्वात मोठी ताकद न्यायव्यवस्था. कारण संसद कधी बहुमताने चालते. सरकार कधी सत्तेच्या अहंकाराने वागते. प्रशासन कधी दबावाखाली झुकते. पण सामान्य माणसाच्या मनात एक आशा कायम जिवंत असते ‘न्यायालयात न्याय मिळेल.’ म्हणून न्यायासन हे कायद्याचे आसन आहे. तसेच ते समाजाच्या नैतिक विश्वासाचे प्रतिक असते. पण जेव्हा न्यायाच्या भाषेतच भेदभावाचे सूक्ष्म सूर ऐकू येऊ लागतात. तेव्हा चिंता अधिक गंभीर होते. अलीकडे दोन घटना चर्चेत आल्या. एक नागपूरातील आणि दुसरी ओरिसातील. वरकरणी या दोन वेगळ्या घटना वाटतात. पण त्यांच्या मुळाशी एकच प्रश्न उभा राहतो. न्यायाचा मापदंड सर्वांसाठी समान आहे का? 14 एप्रिलला देशभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी झाली. नागपुरात हा दिवस स्वाभिमानाचा, इतिहासाच्या स्मरणाचा आणि सामाजिक अस्मितेच्या अभिव्यक्तीचा दिवस असतो. रस्त्यावर मिरवणुका निघतात. डीजे वाजतात. युवक नृत्य करतात. जयभीमच्या घोषणा घुमतात. काही ठिकाणी आवाजाचा अतिरेकही होतो. न्यायालयाने यावर कठोर शब्दांत कानउघाडणी केली. ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश दिले. न्यायमूर्तींनी डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचाही उल्लेख केला. प्रथमदर्शनी हे योग्य आणि संतुलित वाटते. कायद्याचे पालन व्हावे, सार्वजनिक शिस्त राहावी. याला कोणाचाही विरोध असू शकत नाही. प्रश्न इथेच संपत नाही. याच देशात दुर्गा पूजा, कावड यात्रा, गणेशोत्सवात दिवस-रात्र कर्णकर्कश डीजे वाजतात. नदी, तलाव प्रदुषित करतात. दिवाळीत फटाक्यांच्या आवाजाने आकाश दणाणून जाते. निवडणुकीतील विजय मिरवणुका. राजकीय नेत्यांचे स्वागत. धार्मिक यात्रा. सगळीकडे ध्वनीप्रदूषणाचे नियम अक्षरशः पायदळी तुडवले जातात. अनेकदा रात्री दहानंतरही डीजे सुरू असतात. शेकडो मीटर लांबीच्या फटाक्यांच्या लढी फुटतात. धूर, आवाज आणि प्रदूषणाने सामान्य नागरिक हैराण होतो. पण तेव्हा व्यवस्था एवढी अस्वस्थ झालेली दिसत नाही. न्यायालयात तितक्याच तत्परतेने याचिका दाखल होत नाहीत. प्रशासनाची धावपळ दिसत नाही. मग प्रश्न निर्माण होतो. 14 एप्रिलच्याच जल्लोषाकडे इतक्या तीव्रतेने का पाहिले जाते? याचिकेवर सुनावणी करणाऱ्या दोन्ही महिला न्यायाधीश आहेत. महिला अधिक संवेदनशील असतात. त्यांनी राज्यभर कायम स्वरूपी डीजेवर बंदी घालावी किंवा आवाजावर मर्यादा घालावी असे केल्यास महाराष्ट्रावर उपकार होतील. केवळ याचिकेतील सिलेक्टेड प्रकरणावर नको.

हा प्रश्न केवळ डीजेचा नाही. हा प्रश्न समानतेच्या संवेदनशीलतेचा आहे. कायदा जर सर्वांसाठी समान असेल, तर त्याची अंमलबजावणीही सर्वांवर समान झाली पाहिजे. अन्यथा न्यायाच्या भूमिकेवर संशय निर्माण होतो. समाजातील वंचित, बहुजन समाजाला असे वाटू लागते की त्यांच्या उत्सवांकडे ‘गोंधळ’ म्हणून पाहिले जाते. तर इतरांच्या अतिरेकाकडे ‘परंपरा’ म्हणून दुर्लक्ष केले जाते. ही भावना धोकादायक असते. कारण न्याय केवळ दिला जाऊन चालत नाही. तर तो निष्पक्षपणे दिला जात आहे. हे सुद्धा दिसले पाहिजे. याचा अर्थ असा नाही की नियम मोडण्यास कोणालाही मोकळीक असावी. उलट कायद्याची कठोर अंमलबजावणी व्हायलाच हवी. मग तो सण असो, जयंती असो, धार्मिक कार्यक्रम असो किंवा राजकीय मिरवणूक. रात्री दहानंतर लाऊडस्पीकर बंद राहिले पाहिजेत. फटाक्यांवर नियंत्रण असले पाहिजे. ध्वनीप्रदूषण रोखले पाहिजे. पण ही कारवाई निवडक नसावी. अन्यथा न्याय व्यवस्थेच्या निष्पक्षतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहते.



भूपेंद्र गणवीर
9850031019

**ओरिसातील घटना अस्वस्थ करणारी..!**

एका खाणीविरोधात आदिवासी आंदोलन करत होते. त्यांच्या जंगलावर, जमिनीवर आणि अस्तित्वावर घाला येत असल्याने त्यांनी आवाज उठवला. पोलिसांनी त्यांना अटक केली आणि न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. पण त्यासोबत एक अट घातली. त्यांनी पोलिस ठाण्यात सफाई करावी! हा आदेश समोर येताच देशभरातून संताप व्यक्त झाला. कारण ‘सफाई’ हा शब्द भारतीय सामाजिक वास्तवात केवळ कामाचे वर्णन राहत नाही. शतकानुशतके विशिष्ट समाजावर लादलेल्या जातीय अपमानाची ती वेदना बनलेली आहे. त्यामुळे न्यायालयाचा हा आदेश अनेकांना पक्षपाती आणि जातीय मानसिकतेचा वाटला. कदाचित न्यायाधीशांच्या मनात तसा हेतू नसावा. पण न्याय देताना केवळ हेतू पुरेसा नसतो. सामाजिक परिणामांचाही विचार करावा लागतो. न्यायासनावर बसलेली व्यक्ती ही केवळ कायद्याची व्याख्या करणारी नसते. ती समाजाला संदेश देणारीही असते. त्या संदेशातून जर अपमान, पूर्वग्रह किंवा भेदभावाचा संकेत गेला. तर न्याय व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो. ही बाब सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आली. सर्वोच्च न्यायालयाने तात्काळ हस्तक्षेप करून तो आदेश रद्द केला. एवढेच नव्हे, तर भविष्यात अशा प्रकारचे आदेश कुठेही दिले जाऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश दिले. हा हस्तक्षेप महत्त्वाचा होता. कारण त्यातून न्यायव्यवस्थेने स्वतःच स्वतःला सजग केले. समाज बदलला आहे. आज नागरिक जागृत आहेत. सामाजिक माध्यमांमुळे प्रत्येक निर्णय लोकांच्या चर्चेत येतो. न्यायालयीन आदेश समाजाच्या माणसावर परिणाम करतात. म्हणून न्यायव्यवस्थेतील प्रत्येक व्यक्तीने अधिक संवेदनशील आणि तटस्थ राहण्याची गरज आहे. न्यायाधीशही याच समाजातून आलेले असतात. त्यांच्याही मनावर समाजातील संस्कार, पूर्वग्रह आणि परंपरांचा प्रभाव असू शकतो. पण न्यायासनावर बसल्यावर त्या सगळ्यांवर मात करावी लागते. ‘मी कोण?’ याचे भान ठेवावे लागते. कारण न्यायाधीशाचा एक शब्द हजारो लोकांच्या मनात विश्वास निर्माण करू शकतो. किंवा अविश्वासाचे वादळही उठवू शकतो. आज गरज आहे ती समान न्यायाच्या संस्कृतीची. कायदा सर्वांसाठी एकच असावा. त्याची अंमलबजावणीही एकसमान असावी. अन्यथा ‘न्याय’ हा शब्द केवळ पुस्तकात उरेल. समाजाच्या मनात भेदभावाची जखम अधिक खोल होत जाईल. बाकी विधायक सल्ला समाज स्वीकारतोच. आंबेडकरी समाजाने नेहमीच संविधानिक मार्ग स्वीकारला आहे. तो न्यायाचा आदर करतो. पण त्याचवेळी न्याय व्यवस्थेनेही समाजाच्या संवेदनांचा आदर ठेवला पाहिजे. कारण न्यायाचे खरे सौंदर्य समानतेच्या अनुभूतीत असते. ■ ■

# भदन्त सासनरश्मी ‘फख्रुसरविजय’




*‘दुल्लभो पुरिसा जञ्ञ? नसो सबत्थ जायति।*
*यत्थसो जायति धिरो तं सुखं सुखमेधति ॥*

मानवी जन्म हा दुर्लभ आहे. तो सर्वत्र ठिकाणी जन्मास येत नाही. ज्या परिवारात अशाप्रकारची धीर आणि गंभीर व्यक्ती जन्मास येत असते तो परिवारच नव्हे तर समाज, विश्व देखिल सुखाकुल होत असतो. भदन्त सासनरश्मी ‘फख्रुसरविजय’, एक आगळे वेगळे बहुआयामी व्यक्तिमत्व; स्वतःजवळ धम्मज्ञानाचे व विविध भाषांचे भंडार घेवुन वावरणारे. अशी वेगळीच व महत्वपूर्ण छाप असलेली त्यांची छबी माझ्या डोळ्यांसमोर अजुनही तरळते आहे. त्यांच्यावर लेख लिहीणे म्हणजे ठेवणीतले कोणते शब्द वापरावे हाच प्रश्न मला पडतो आहे. असे जरी असले तरी त्यांच्या जन्मस्मृतिदिनी अगदी लहानपणापासून भन्तेजींच्या संबंधाविषयीच्या ज्या ज्या आठवणी स्मृतीत साठवलेल्या आहेत, त्या वलयांकीत आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न भन्तेजींवर हा लेख लिहितांना मी येथे करत आहे.

‘दुल्लभो पुरिसो जञ्ञो, न सो सब्बत्थ जायति’ - ज्ञानी, धीर आणि करुणामय व्यक्तींचा जन्म हा नेहमीच दुर्मिळ असतो. अशा व्यक्ती केवळ एका कुटुंबाचे नव्हे, तर संपूर्ण समाजाचे आणि मानवतेचे मार्गदर्शक ठरतात. पुज्य भदन्त सासनरश्मी ‘फख्रुसरविजय’ हे असेच एक विलक्षण, बहुआयामी आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या जीवनकार्याने भारतीय बौद्ध चळवळीला नवी दिशा दिली. भदन्त सासनरश्मी यांचा जन्म 7 मे 1922 रोजी भंडारा जिल्ह्यातील पवनी येथे झाला. बालपणापासूनच त्यांच्यात जिज्ञासा, अभ्यासू वृत्ती आणि आध्यात्मिक ओढ होती. इतर मुलांप्रमाणेच त्यांनाही सामान्य आवडी-निवडी होत्या; परंतु नियतीने त्यांच्यासाठी वेगळेच ध्येय ठरवले होते. लहान वयातच त्यांनी घर सोडले आणि धम्माच्या शोधात प्रवास सुरू केला. या प्रवासात त्यांना माकडे गुरुजी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी केवळ गुरू म्हणून नव्हे, तर पालकाप्रमाणे त्यांची जडणघडण केली. भन्तेजींचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, पण प्रभावी होते. शरीराने लहान असले तरी विचारांनी ते अत्यंत उंच होते. त्यांच्या चेहऱ्यावर विलक्षण तेज आणि शांतता होती. त्यांनी थाई, पाली, मराठी, इंग्रजी, उर्दू, संस्कृत, सिंहली अशा अनेक भाषांवर प्रभुत्व मिळवले होते. विविध भाषांतील ज्ञानामुळे त्यांचा संवाद प्रभावी आणि लोकांच्या मनाला भिडणारा ठरत असे. उर्दूतील शेरो-शायरीचा वापर करून ते धम्माचे गूढ विचार सहज समजावून सांगत असत. त्यांच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे त्यांची धम्मकार्यासाठीची अखंड तळमळ. त्यांनी सारनाथ येथे वटथाई महाविहार उभारण्यात मोठे योगदान दिले. ते मृगदायवन महाविहार सोसायटीचे संस्थापक होते. थायलंडमध्ये जाऊन त्यांनी तेथील बौद्ध संस्कृतीचा अभ्यास केला आणि त्या अनुभवातून भारतात धम्मकार्याची नवी दिशा निर्माण केली. सारनाथसारख्या पवित्र स्थळी त्यांनी केलेले कार्य हे भारतीय बौद्ध इतिहासातील एक महत्त्वाचे पर्व मानले जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीपूर्वीच भन्तेजी बौद्ध भिक्षू झाले होते. त्यामुळे आधुनिक भारतातील प्रारंभीच्या बौद्ध भिक्षूंमध्ये त्यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. जुलै 1950 मध्ये श्रीलंकेत झालेल्या जागतिक बौद्ध परिषदेत भारतीय बौद्ध प्रतिनिधी म्हणून सहभागी होण्याचा मान त्यांना मिळाला. याच परिषदेत त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जवळून भेटण्याची संधी मिळाली. हा प्रसंग त्यांच्या आयुष्यातील आणि भारतीय बौद्ध चळवळीतील एक ऐतिहासिक क्षण होता. भन्तेजींच्या धम्मकार्याची अनेक उदाहरणे आजही लोकांच्या स्मरणात आहेत. नागपूरच्या सिरसपेठ येथील धम्मचक्र प्रवर्तन बौद्ध विहाराला त्यांनी थायलंडमधील भगवान बुद्धांची मूर्ती दान दिली. भिवापूर तालुक्यातील पुलर गावात अष्टधातूची बुद्धमूर्ती स्थापित करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. या सर्व कार्यात ते स्वतः उपस्थित राहून लोकांना प्रेरणा देत असत. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला वेगळीच ऊर्जा मिळत असे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव इतका मोठा होता की विविध क्षेत्रांतील लोक त्यांना भेटण्यासाठी येत असत. ते अखिल भारतीय भिक्षुसंघाचे महासचिव असताना नागपूरला वारंवार येत. आमदार निवास येथे त्यांचा मुक्काम असायचा. लोकांशी संवाद साधताना ते अत्यंत साधेपणाने पण प्रभावी शब्दांत मार्गदर्शन करीत. त्यांचे बोलणे ऐकताना लोक भारावून जात असत. भन्तेजींना साहित्याचीही विशेष आवड होती. विविध पुस्तकांच्या प्रकाशन समारंभात ते सहभागी होत. त्यांच्या भाषणात अभ्यास, विचारांची खोली आणि धम्माची करुणा यांचा सुंदर संगम दिसत असे. त्यांनी केवळ धार्मिक कार्य केले नाही, तर सामाजिक आणि सांस्कृतिक जागृतीचेही मोठे काम केले. त्यांच्या आठवणी आजही अनेकांच्या मनात जिवंत आहेत. ज्यांनी त्यांना प्रत्यक्ष पाहिले, त्यांच्याशी संवाद साधला, त्यांना त्यांच्या साधेपणात दडलेले महानत्व अनुभवायला मिळाले. त्यांच्या चेहऱ्यावरचे तेज, त्यांची गंभीर पण प्रेमळ वाणी आणि धम्मासाठीची निष्ठा हे सर्व आजही प्रेरणा देणारे आहे. 22 डिसेंबर 2010 रोजी भन्तेजींच्या निधनाची बातमी अनेकांसाठी मोठा धक्का होता. त्यांच्या जाण्याने बौद्ध समाजाने एक विद्वान, अभ्यासू आणि करुणामय धम्मनायक गमावला. मात्र त्यांनी केलेले कार्य, त्यांनी दिलेली शिकवण आणि त्यांनी निर्माण केलेली धम्मपरंपरा आजही समाजाला मार्गदर्शन करत आहे.

आज त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, अशा व्यक्तिमत्त्वांचा जन्म क्वचितच होतो. त्यांनी स्वतःचे जीवन धम्मासाठी अर्पण केले आणि हजारो लोकांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण केला. ‘उंची लहान पण कीर्ती महान’ हे वर्णन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अगदी सार्थ ठरते.

पुज्य भदन्त सासनरश्मी ‘फख्रुसरविजय’ यांचे जीवन हे ज्ञान, करुणा, साधेपणा आणि समर्पण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांच्या स्मृती समाजाला सदैव धम्ममार्गावर चालण्याची प्रेरणा देत राहतील. 22 डिसेंबर 2010 रोजी सकाळीच फोन ची घंटा वाजली, बाबांचा आवाज होता व त्यांच्या तोंडातून शब्द निघाले ‘मोठे भन्तेजी गेले’. बाबांचे हे शब्द माझ्या मनावर मोठा आघात करुन गेले व शेवटच्या काळात त्यांना भेटु शकले नाही याचा त्रास जास्तच जाणवू लागला. त्यानंतर आम्ही सारनाथला त्यांना बघायला गेलो तेव्हा भन्तेजींना, त्यांच्या शरिराला ‘रक्षा करुन शवपेठीत’ ठेवलेले बघितले. आता त्यांची व माझी भेट झाली होती. पण त्यांचा देह मात्र शांत झाला होता. अक्षरशः अजुनही ते दृश्य डोळ्यांपुढून जात नाही. अशी ही ‘उंची लहान व किर्ती महान’ असलेले थोर व्यक्तीमत्व, 10 ते 11 विविध भाषेंवर प्रभुत्व असलेले, चेहऱ्यावर विलक्षण प्रभा व कांती. थाई, पालि, इंग्रजी, उर्दु, मराठी, सिंहली, संस्कृत भाषेचे प्रगाढ ज्ञान असलेले ‘मोठे भन्तेजी’ आता होणे नाही. अशा प्रगल्भ, धम्मविचार मिमांसक व्यक्तीमत्वाला, भन्तेजींना त्रिवार वंदन करून या लेखाला पुर्णविराम देते. ■ ■

प्रा. डॉ. प्रिया खापर्डे (भगत)
मो.7387700330

# निवडणूक जिंकण्यासाठी भाजप काहीही करेल!




पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी या राज्यांतील विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर देशातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या निवडणुकांमध्ये भाजपने काही राज्यांत यश मिळवले, तर काही ठिकाणी पराभव स्वीकारावा लागला. मात्र पश्चिम बंगालमधील निकालानंतर निवडणूक प्रक्रियेबाबत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. विरोधी पक्षांकडून निवडणूक आयोग, शासकीय यंत्रणा आणि केंद्रीय सत्तेवर संगनमताचे आरोप केले जात आहेत. पश्चिम बंगालमध्ये भाजपने कोणत्याही परिस्थितीत सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष गहन पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रियेद्वारे मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे वगळल्याचे आरोप करण्यात आले. विरोधकांच्या मते, या प्रक्रियेचा फटका मुख्यतः विरोधी मतदारांना बसला. ईव्हीएम संदर्भातही फेरफार आणि छेडछाडीचे आरोप झाले.

निवडणुकीनंतर पश्चिम बंगालमध्ये हिंसाचाराच्या घटना घडल्या. विरोधकांचा आरोप आहे की केंद्रीय यंत्रणा या घटनांकडे दुर्लक्ष करत आहेत. गुजरातमध्ये जे मॉडेल पूर्वी दिसले, त्याच प्रकारची परिस्थिती बंगालमध्ये निर्माण केली जात असल्याचा आरोप होत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गुजरातला ‘प्रयोगशाळा’ म्हटल्याच्या पार्श्वभूमीवर हे आरोप अधिक तीव्र झाले आहेत. भाजपवर असा आरोप होत आहे की, निवडणूक जिंकण्यासाठी ते कोणत्याही मर्यादा ओलांडू शकतात. लोकशाही, संविधान आणि निवडणूक प्रक्रिया यांचा केवळ देखावा ठेवून प्रत्यक्षात सत्ताकेंद्रित राजकारण सुरू असल्याची भावना विरोधक व्यक्त करत आहेत. गोदी मीडिया, तपास यंत्रणा आणि निवडणूक आयोग यांच्या माध्यमातून वातावरण तयार केले जाते, असा आरोप केला जात आहे. आज देशात लोकशाही संस्था स्वतंत्रपणे काम करत आहेत का, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. निवडणूक आयोग आणि न्यायालयांच्या भूमिकेवरही संशय व्यक्त केला जात आहे. विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यांना लक्ष्य करणे, मतमोजणी केंद्रांवर दबाव निर्माण करणे आणि विरोधकांना दुय्यम वागणूक देणे या गोष्टी लोकशाहीसाठी धोकादायक असल्याचे अनेकांचे मत आहे. तामिळनाडूतील निवडणुकीत द्रविड राजकारणाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून आला. भाजपविरोधी विचारांचे पक्ष तिथे मजबूत राहिले. नव्या नेतृत्वाला मतदारांनी संधी दिली. भाजपला तेथे अपेक्षित यश मिळाले नाही. यामागे द्रविड अस्मिता, सामाजिक न्याय आणि ब्राम्हणवादविरोधी विचारधारा महत्त्वाची ठरली. विरोधकांचा आरोप असा आहे की भाजप स्वतःच्या संघटनशक्तीपेक्षा तपास यंत्रणा, उद्योगपती, मीडिया आणि राजकीय दबावाचा वापर करून इतर पक्षांना कमजोर करत आहे. ईडी, सीबीआय आणि इतर संस्थांचा वापर करून विरोधी नेत्यांवर दबाव आणला जातो, अशी भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक प्रादेशिक पक्ष कमकुवत झाले किंवा फुटले. देशातील राजकीय परिस्थितीकडे पाहता, विरोधी पक्षांनी एकत्र येण्याची गरज निर्माण झाली आहे. उत्तर प्रदेश आणि पंजाबसारख्या राज्यांतील आगामी निवडणुका लक्षात घेता, विरोधकांमध्ये एकजूट नसल्यास भाजपला त्याचा फायदा होऊ शकतो. अनेक लहान पक्षांचे अस्तित्व धोक्यात आले असून, ते क्रमाक्रमाने कमकुवत होत चालल्याचे दिसते. लेखकाच्या मते, देशात मोठा राष्ट्रीय पक्ष म्हणून काँग्रेस उरली आहे. काँग्रेसशी वैचारिक मतभेद असले तरी संविधान, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेचे रक्षण करण्यासाठी विरोधी पक्षांनी व्यापक एकजूट करणे आवश्यक आहे. अन्यथा देशात मनुस्मृतीवादी आणि हुकूमशाही प्रवृत्ती अधिक मजबूत होतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे. महिला, ओबीसी, दलित, आदिवासी, मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध आणि इतर अल्पसंख्याक समाजांसाठी ही परिस्थिती गंभीर असल्याचे लेखकाचे मत आहे. सामाजिक न्यायाची लढाई केवळ राजकीय नाही, तर सांस्कृतिक संघर्ष असल्याचे ते म्हणतात. समाजातील परिवर्तनवादी विचारवंत, संत आणि महापुरुष यांच्या वारशावरही भविष्यात हल्ले होऊ शकतात, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. देशातील अनेक प्रादेशिक पक्ष आधीच कमजोर झाले आहेत. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, जनता दल, कम्युनिस्ट पक्ष, अकाली दल, तेलगू देसम आणि इतर पक्षांना फोडाफोडीच्या राजकारणाचा फटका बसल्याचे लेखक नमूद करतात. अल्पसंख्याक समाजातही असुरक्षिततेची भावना वाढत आहे. आजची परिस्थिती केवळ सत्तेची लढाई नाही, तर संविधानिक मूल्ये आणि लोकशाही टिकवण्याचा संघर्ष आहे, असे लेखकाचे मत आहे. त्यामुळे सर्व परिवर्तनवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाहीवादी शक्तींनी एकत्र येऊन संविधानाच्या रक्षणासाठी उभे राहणे आवश्यक असल्याचे ते सांगतात. भारतीय लोकशाही टिकवण्यासाठी सजग नागरिक, मजबूत विरोधक आणि स्वतंत्र संस्था आवश्यक आहेत. अन्यथा निवडणुका केवळ औपचारिकता बनतील आणि लोकशाहीचा आत्माच धोक्यात येईल, असा इशारा या लेखातून देण्यात आला आहे. सर्वांना भाजपने गिळंकृत केले आहे. शिवसेना, राष्ट्रवादी, जनता दल कम्युनिस्ट, आसाम गण परिषद, तृणमूल, नॅशनल कॉन्फरन्स, अकाली दल, लोकदल, तेलगू देशम या सर्वच पक्षांची सारखीच गती केली आहे. तशी सर्वच अल्पसंख्य धार्मिक घटकांची गोची केली आहे. कोणीच सुरक्षित नाही. झोपड्या जाळण्याचा काळ गेला. आता बुलडोझरनी बंगले पाडण्याचा काळ आला. तुमची दुकाने दंगलीत जाळल्या जातील. त्याच्यासाठी दंगली होतात. तुमची धर्मस्थळे पाडल्या जातील व तुमचे सामूहिक हत्याकांड घडून येतील. ते वारे वाहू लागले आहेत. म्हणून या घडामोडी केवळ राजकीय सत्ता या मर्यादेत नाहीत. तो सांस्कृतिक संघर्ष आहे. हे भान ठेऊन आता पावले टाकू या. ■ ■

लेखांक 156



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

# जनगणनेला शेंदूर नको...

## जनगणना 2026-27 ला शेंदूर लावणारांना फेकून द्या

ऐतिहासिक दृष्ट्या आणि सांस्कृतिक दृष्ट्या शेंदूर लावण्याचे अनेक परिणाम भारतात दिसतात. जसे अमिरखान यांचे ‘पिके’ चित्रपटात एक गमतीशीर प्रसंग दाखविला आहे की रस्त्याचा कडेला झाडाखालील कोणत्याही गोट्याला लाल - केसरी रंग फासला म्हणजे त्याचा देव होतो आणि सामान्य लोक त्याची पूजा करतात. फुले आणि पैसे वाहतात. ‘पिके’ चित्रपटात एक बिना गुंतवणुकीचा व्यवसाय म्हणून सदर प्रसंग विदित केला आहे. असा प्रसंग बहुसंख्य भारतीयांची अंधश्रद्धाळू आणि गुलाम मानसिकता दर्शविते की जिथे प्रश्न विचारण्याची सवय नाही. तुम्ही कोणत्याही गावात गेलात तर अशी रस्तोरस्ती शेंदूर फासलेले देव दिसतील आणि कालांतराने त्याचे मोठ्या मंदिरात रूपांतर होते. यातून भारतीयांची दैववादी मानसिकता दिसते. त्याचीच दुसरी बाजू म्हणजे प्रयत्नशीलता गमावणे. दैव आपले चांगले करेल अशी वाट बघणे. अंगारे, धुपारे, बाबा, भविष्य, वास्तू अशाच मानसिकतेच्या उत्पत्ती आहेत. बौद्ध धम्माचा विध्वंस केल्यानंतर भगवान बुद्धाच्या प्रतिमांचे विद्रुपीकरण करून त्यांना वेगवेगळ्या देवी देवतांच्या मूर्ती दाखविण्यात सुद्धा शेंदूर डावपेचात्मकपणे वापरला आहे. शेंदुराच्या परतीवर परती लावल्यावर खोळ तयार होते आणि अशी खोळ आत काय आहे ते लपविते. आज अनेक निवृत्त अधिकारी आणि आरएसएस, बीजेपी चे दलाल असाच शेंदूर जनगणना 2026-27 ला लावीत आहेत. अशी निवृतांची निकामी फौज जनगणना 1991, जनगणना 2001 आणि जनगणना 2011 नंतर आजतागायत तब्बल 35 वर्षांची प्रदीर्घ झोप शेंदूर हातात घेऊन जागी झाली. असे म्हणण्याचे कारण की अनुसूचित जाती आणि जमाती यांचे शिक्षण, नोकरी व वार्षिक अर्थसंकल्पातील आर्थिक तरतूद इत्यादी सर्व प्रश्नांची उत्तरे जनगणना 2026-27 मध्ये शोधतात. असा छद्म प्रचार केला जात आहे. असे चित्र उभे करण्यात येत आहे की 14 ऑक्टोबर 1956 ला सोडलेली महार जात लिहा म्हणजे वरील सर्व प्रश्न सुटतील. सब मर्जोंकी एक ही दवा. महार जात लिहा आणि सर्व




प्रश्न सोडवा. म्हणजे विवेकशील आणि प्रयत्नवादी बौद्ध समाजाला असे सांगत आहेत की नवा बाबा जनगणनेला शेंदूर फासा. बाबा जनगणना तुमचे भले करेल. सर्व प्रश्न सोडवेल. जय बाबा जनगणना बौद्ध समाजाचे नोकरी, शिक्षण आणि अर्थसंकल्पातील आर्थिक तरतुदींचे प्रश्न आहेत काय? तर असे अनेक प्रश्न आहेत आणि ते सर्व प्रश्न अनेक दशकांपासून साचून आहेत. शिक्षणाचे स्वरूप 80 च्या दशकापासून बदललेले आहे. शिक्षण महाग आणि दुर्मिळ झाले आहे. 1991 नंतर भारताचे आर्थिक धोरण जागतिकीकरण व खाजगीकरण यामुळे संपूर्ण बदलले. आमच्या नोकऱ्या गेल्या आणि महागाई आकाशाला भिडली. आरएसएस-बीजेपी यांचे शासन 2014 साली सत्तेवर आल्याबरोबर त्यांनी भारतीय नियोजन आयोग मोडीत काढून नीती आयोग स्थापन केला. त्यामुळे हक्काने अनुसूचित जाती आणि जमाती यांना अनुक्रमे मिळणारा SCP म्हणजे Special Component Plan आणि TSP म्हणजे Tribal Sub Plan निधी संपविला. अशा प्रकारे लोक कल्याणकारी राज्याची मूळ संकल्पना मोडीत काढली. अशी अनेक मूळ कारणे असतांना त्यावर उपाययोजना करण्याऐवजी नसलेला जनगणनेचा उपाय सांगून ब्राम्हणवादाची अस्त्रे भ्रम, भीती आणि शब्दच्छल वापरून बौद्ध समाजाला नव्याने शेंदूर फसलेल्या बाबा जनगणना याचे नादी लावण्याचा प्रकार घडत आहे. आज जर आमचे नोकरी, शिक्षण आणि आर्थिक तरतुदींचे प्रश्न आहेत तर त्याचे मुख्य कारण मागील अनेक दशकांचा नाकर्तेपणा आहे. सुज्ञ आणि दुरगामी उपाय म्हणजे आज आम्ही आमची राजकीय ताकद नव्याने उभी करणे आवश्यक आहे. असा पर्याय कठीण परंतु अत्यावश्यक आहे. राजकीय ताकद उभी करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या States and Minorities या ग्रंथात सांगितलेली आर्थिक तत्वे आजच्या संदर्भात लागू केली पाहिजेत आणि त्याचबरोबर आपल्या राज्यघटनेत अनुस्यूत केलेली Directive Principles of State Policy यांची सांगड घालून भारतीय लोकशाहीची खोली आणि रुंदी वाढविण्याची ‘जबाबदारी’ आम्ही घेतली पाहिजे. फक्त कोणी आरएसएस चा वरिष्ठ स्वयंसेवक व भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचा माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष अशोक मेंढे, समरसता मंच प्रमुख माजी आमदार भाई विजय गिरकर आणि बीजेपी चा माजी मंत्री राजकुमार बडोले व माजी आमदार मिलिंद माने सांगतो तसेच त्याची री ओढणारे समाजातील स्वतःला कितीही मोठे समजणारे धुरीण असतील तरीही घृणीत ‘समरसतेच्या दिंडीत’ सामील झालेल्यांना बौद्ध समाजाने असा जनगणनेला शेंदूर फसणाऱ्यांना फेकून दिले पाहिजे. प्रत्येक काळातील पिढीवर काही ‘जबाबदारी’ असते आणि पुढील पिढ्यांच्या भवितव्यासाठी त्यांना ती पूर्ण करावी लागते. कुठलेही सोपे उपाय कधीही परिणामकारक नसतात. जेवढा मोठा प्रश्न तेव्हढे उपाय कठीण. आम्ही बौद्ध विवेकशील आणि प्रयत्नवादी बनू या. आपले मुक्तिदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ‘प्रबुद्ध भारत’ स्वप्नपूर्तीसाठी बौद्धांची खरी लोकसंख्या सर्वांना दाखवू या आणि येत्या जनगणना 2026-27 मध्ये स्वाभिमानाने फक्त आणि फक्त ‘बौद्ध’ नोंद करू या !!! ■ ■

मिलिंद पखाले
मो.9764470174

# आई : ममतेचा अखंड झरा




मानवी जीवनात अनेक नाती येतात आणि काळानुसार बदलतात; परंतु आईचे नाते जन्मापासून आयुष्याच्या शेवटपर्यंत माणसाला आधार देणारे असते. आई ही केवळ जन्मदात्री नसून संस्कारांची पहिली शाळा, जीवनमूल्यांची पहिली गुरू आणि संकटसमयी धीर देणारी शक्ती असते. म्हणूनच मातृत्वाचा गौरव करण्यासाठी जगभरात मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी ‘मातृ दिन’ साजरा केला जातो. हा दिवस केवळ शुभेच्छांचा नसून आईच्या त्याग, प्रेम आणि कष्टांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे.

आईचे मातृत्व बालकाच्या जन्मापूर्वीच सुरू होते. स्वतःच्या शरीरात नवजीवन वाढवत असताना ती अनेक वेदना सहन करते. बालक जन्मल्यानंतर त्याचे संगोपन, शिक्षण आणि आरोग्याची काळजी घेताना ती स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार करत नाही. मुलांच्या भवितव्यासाठी आयुष्यभर झटणे हेच तिचे जीवनकार्य बनते. म्हणूनच प्रत्येक महान व्यक्तीच्या यशामागे आईचे योगदान महत्त्वाचे असते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर जिजाऊंच्या संस्कारांचा खोल प्रभाव होता. जिजाऊंनी शिवरायांना स्वराज्याचे स्वप्न आणि न्यायाची प्रेरणा दिली. यावरून आई ही व्यक्तिमत्त्व घडवणारी महान शक्ती असल्याचे स्पष्ट होते. आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जीवनशैली बदलली असली तरी आईचे महत्त्व अजूनही अबाधित आहे. उलट वाढत्या धकाधकीच्या जीवनात आईची भूमिका अधिक महत्त्वाची बनली आहे. अनेक महिला घर आणि करिअर यांचा समतोल साधत कुटुंबासाठी संघर्ष करताना दिसतात. ग्रामीण भागातील आईचे जीवन विशेषतः कष्टमय असते. शेतीची कामे, घरातील जबाबदाऱ्या, मुलांचे संगोपन आणि वृद्धांची सेवा करताना ती स्वतःच्या आरोग्याकडेही दुर्लक्ष करते. तरीही ती तक्रार न करता कुटुंबासाठी राबत राहते. शहरी भागातील मातृत्वालाही वेगळी आव्हाने आहेत. वाढती स्पर्धा, महागाई, मुलांचे शिक्षण आणि डिजिटल युगातील बदलती मूल्ये यामुळे महिलांवर मानसिक ताण वाढला आहे. सामाजिक माध्यमांचे परिणाम, मुलांमधील वाढती एकटेपणाची भावना आणि व्यसनाधीनतेसारख्या समस्यांमध्ये आई केवळ पालनकर्ती राहत नाही, तर मार्गदर्शक आणि समुपदेशकही बनते. मुलांच्या मानसिक आरोग्यामध्ये आईची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तिचे प्रेम आणि संवाद मुलांना आत्मविश्वास देतात. आजच्या काळात वृद्धाश्रमांची वाढ ही चिंतेची बाब आहे. ज्यांनी आयुष्यभर मुलांसाठी कष्ट केले, त्याच आई-वडिलांना वृद्धापकाळात एकटेपण सहन करावे लागते. मातृदिन साजरा करताना समाजाने या वास्तवाकडे गंभीरपणे पाहण्याची गरज आहे. आईचा सन्मान केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता तो आपल्या वर्तनातून दिसला पाहिजे. तिच्या आरोग्याची काळजी घेणे, घरकामात मदत करणे आणि तिच्यासोबत वेळ घालवणे ही खरी कृतज्ञता ठरते. साहित्य आणि संस्कृतीमध्येही आईचे स्थान विशेष आहे. साने गुरुजींचे ‘श्यामची आई’ हे पुस्तक मातृत्वाच्या संवेदनशीलतेचे उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. मराठी साहित्य, लोकगीते आणि चित्रपटांमध्ये आईच्या प्रेमाचे भावस्पर्शी चित्रण आढळते. आई ही मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची पहिली शिल्पकार असते. प्रामाणिकपणा, शिस्त, करुणा आणि परिश्रम यांसारखे संस्कार मुलांना आईकडूनच मिळतात. समाजातील प्रत्येक महिलेला सुरक्षित, सन्मानजनक आणि आरोग्यपूर्ण जीवन मिळणे आवश्यक आहे. मातृत्वाचा सन्मान करायचा असेल तर महिलांच्या शिक्षण, आरोग्य आणि समान हक्कांची हमी दिली पाहिजे. मातृत्व ही केवळ महिलांची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. आई ही जीवनाची पहिली कविता, पहिली प्रार्थना आणि पहिला देव असते. तिच्या ममतेमध्ये स्वार्थ नसतो, असते ती फक्त निस्सीम करुणा. म्हणूनच आईचे प्रेम जगातील कोणत्याही संपत्तीपेक्षा अधिक मौल्यवान आहे. मातृ दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने आईचा सन्मान, तिच्या कष्टांची जाणीव आणि तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा संकल्प केला पाहिजे. ■ ■



डॉ. राजेंद्र बगाटे
मो. 9960103582

“ छोटे पाऊलही, मोठ्या यशाकडे नेतात... ”



# डॉ. आंबेडकरांच्या वृत्तपत्राची संपादकीय भूमिका

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूकनायक वृत्तपत्र जन्मशताब्दीनंतर आता बहिष्कृत भारत वृत्तपत्र जन्मशताब्दी वर्ष साजरे होत आहे. ही वृत्तपत्रे जरी अल्पकाळ चालली, तरी त्यांनी सामाजिक परिवर्तनाची ज्योत प्रज्वलित ठेवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपादकीय अग्रलेखांनी वाचनाची आवड निर्माण करून मोठा वाचकवर्ग घडविला. आजही त्यांचे तत्कालीन अग्रलेख अत्यंत प्रासंगिक वाटतात. हीच दिशादर्शक रेषा घेऊन आंबेडकरी बाण्याचे दैनिकांनी समाजप्रबोधनाची परंपरा पुढे नेली आहे.**

भारतात जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे. या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अखेर सरकारला या प्रश्नावर निर्णय घेण्याची वेळ आली. मात्र त्याचवेळी अनुसूचित जाती संघटित राहू नयेत, यासाठी ‘फोडा आणि राज्य करा’ या नीतीतून उपवर्गीकरणाचा मुद्दा पुढे आणला जात आहे. हा मुद्दा अनुसूचित जातींसाठी किती घातक आहे, यावर सातत्याने मंथन झाले. सभा, संमेलन, रस्त्यावरील आंदोलने आणि चर्चांमधून हा विषय जनतेसमोर आला. हाच मुद्दा संपादकीय अग्रलेखातून दैनिक बहुजन सौरभने ठामपणे मांडला आहे. वृत्तपत्र वाचन हे जागरूक नागरिक असण्याचे लक्षण आहे. म्हणूनच ‘आपले हक्काचे दैनिक’ या भावनेतून आपले दैनिक उभे राहिले आहे. आजचा काळ माहितीचा, स्पर्धेचा आणि वेगवान बदलांचा आहे. प्रत्येकाच्या हातात मोबाईल आला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून दररोज लाखो बातम्या, व्हिडिओ, मते आणि माहिती आपल्या डोळ्यांसमोर येत असतात. परंतु या प्रचंड माहितीच्या गर्दीत सत्य काय, असत्य काय, योग्य काय आणि अयोग्य काय, हे ओळखण्याची क्षमता प्रत्येकामध्ये असणे अत्यंत आवश्यक झाले आहे. ही क्षमता सहजपणे निर्माण होत नाही. त्यासाठी सतत वाचन, चिंतन, निरीक्षण आणि विश्लेषण करण्याची सवय लागावी लागते. विशेषतः ‘संपादकीय लेख’ वाचन आणि समाजातील घटनांचे ‘निरीक्षण’ ही बौद्धिक प्रगल्भतेची दोन महत्त्वाची साधने आहेत. संपादकीय लेख हा केवळ वृत्तपत्रातील एक लेख नसतो; तो समाजाच्या विचारप्रवाहाला दिशा देणारा, प्रश्न उपस्थित करणारा आणि वाचकाला विचार करण्यास भाग पाडणारा बौद्धिक दस्तऐवज असतो. तसेच निरीक्षण म्हणजे फक्त डोळ्यांनी पाहणे नव्हे, तर समाजातील बदल, माणसांचे वर्तन, राजकीय घडामोडी, सांस्कृतिक परिवर्तन आणि आर्थिक परिस्थिती यांचे सूक्ष्म आकलन करणे होय. त्यामुळे निरीक्षण आणि अग्रलेख वाचन हे व्यक्तिमत्त्व विकासासाठी, सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी आणि लोकशाही मजबूत करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.






एखादी घटना, परिस्थिती, व्यक्ती किंवा समाजव्यवस्था याकडे केवळ वरवर न पाहता सखोल दृष्टीने पाहणे म्हणजे निरीक्षण होय. माणूस रोज अनेक घटना पाहतो; परंतु प्रत्येक जण निरीक्षक असतोच असे नाही. निरीक्षण करणारी व्यक्ती प्रत्येक घटनेमागील कारण, परिणाम आणि त्यातील सामाजिक संदर्भ समजून घेण्याचा प्रयत्न करते. उदाहरणार्थ, एखाद्या गावात पाण्याची टंचाई असेल, तर सामान्य माणूस फक्त ‘पाणी नाही’ एवढेच पाहतो; पण निरीक्षण करणारी व्यक्ती त्या समस्येमागील प्रशासनाची उदासीनता, पर्यावरणाचा ऱ्हास, लोकसंख्यावाढ, पाण्याचे चुकीचे नियोजन आणि सामाजिक विषमता यांचाही विचार करते. अशा प्रकारचे निरीक्षण समाज समजून घेण्याची क्षमता वाढवते. एखाद्या महत्त्वाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक किंवा सांस्कृतिक विषयावर वृत्तपत्राची अधिकृत भूमिका संपादकीय लेखातून मांडली जाते. सं. हा केवळ माहिती देत नाही, तर तो वाचकाला विचार करायला भाग पाडतो. संपादकीय लेखामध्ये घटनांचे विश्लेषण, पार्श्वभूमी, परिणाम आणि उपाय यांचा समावेश असतो. म्हणूनच संपादकीय लेख वाचन हे केवळ विद्यार्थ्यांसाठी नव्हे, तर समाजातील प्रत्येक सजग नागरिकासाठी आवश्यक आहे.

संपादकीय लेख वाचन का करावे?

1) **विचारशक्ती विकसित होते :** संपादकीय लेख वाचल्याने माणसाची विचार करण्याची क्षमता वाढते. एखाद्या विषयाचे विविध पैलू समजून घेण्याची सवय लागते. माणूस केवळ भावनिक न राहता तर्कशुद्ध विचार करू लागतो.

2) **सत्य-असत्य ओळखण्याची क्षमता निर्माण होते :** आज सोशल मीडियावर अफवा, खोटी माहिती आणि दिशाभूल करणारे संदेश मोठ्या प्रमाणात पसरवले जातात. अशावेळी अग्रलेख वाचनामुळे व्यक्तीमध्ये सत्य-असत्य ओळखण्याची क्षमता निर्माण होते.

3) **सामाजिक जाणीव वाढते :** बेरोजगारी, महागाई, जातीयवाद, महिलांवरील अत्याचार, शेतकरी समस्या, शिक्षणातील असमानता, भ्रष्टाचार आणि लोकशाहीतील प्रश्न यांवर अग्रलेख प्रकाश टाकतो. त्यामुळे वाचक अधिक सजग होतो. जो माणूस समाजातील प्रश्न समजून घेतो, तोच समाजपरिवर्तनासाठी पुढे येऊ शकतो.

4) **लोकशाही मजबूत होते :** लोकशाहीमध्ये सजग नागरिकांची गरज असते. मतदान करणे एवढेच नागरिकत्व नाही. शासनाचे निर्णय, धोरणे आणि राजकीय घडामोडी समजून घेणेही महत्त्वाचे आहे. अग्रलेख वाचनामुळे शासनाच्या धोरणांचा अभ्यास करता येतो. सरकार योग्य निर्णय घेत आहे की नाही, याचा विचार करता येतो. त्यामुळे लोकशाही अधिक मजबूत होते.

5) **भाषाशैली सुधारते :** अग्रलेखामध्ये समृद्ध भाषा, प्रभावी शब्दसंपदा आणि नेमकी मांडणी असते. नियमित अग्रलेख वाचनामुळे भाषेवर प्रभुत्व वाढते आणि लेखनकौशल्य विकसित होते. विशेषतः विद्यार्थ्यांसाठी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांसाठी आणि लेखकांसाठी अग्रलेख वाचन अत्यंत उपयुक्त ठरते.

6) **व्यक्तिमत्त्व विकास घडतो :** जो माणूस सतत वाचन करतो, निरीक्षण करतो आणि विचार करतो, तो अधिक परिपक्व बनतो. त्याच्या बोलण्यात आत्मविश्वास येतो. त्याला कोणत्याही विषयावर स्वतःचे मत मांडता येते. अग्रलेख वाचनामुळे व्यक्तीमध्ये बौद्धिक समृद्धी निर्माण होते आणि व्यक्तिमत्त्व प्रभावी बनते.

**निरीक्षणाचे महत्त्व :** फक्त पुस्तकी ज्ञान पुरेसे नसते. समाजाचे वास्तव समजण्यासाठी निरीक्षण आवश्यक असते. रस्त्यावरची माणसे, गावातील समस्या, शहरातील बदल, तरुणांचे प्रश्न, शेतकऱ्यांचे दुःख. हे सर्व निरीक्षणातून समजते. निरीक्षण करणारा माणूस अधिक संवेदनशील असतो. दुसऱ्यांच्या वेदना समजून घेण्याची क्षमता त्याच्यात असते. त्यामुळे समाजात माणुसकी टिकून राहते. लेखक, पत्रकार, कलाकार आणि विचारवंत यांच्या सर्जनशीलतेमागे तीव्र निरीक्षणशक्ती असते. निरीक्षणातूनच नवीन कल्पना जन्म घेतात. तसेच निरीक्षण करणारी व्यक्ती परिस्थितीचे विश्लेषण करू शकते. त्यामुळे ती योग्य निर्णय घेऊ शकते. जीवनात यशस्वी होण्यासाठी ही क्षमता अत्यंत आवश्यक आहे.



विलास गजभिये
मो. 9421588901

**आजच्या काळातील संपादकीय लेख वाचनाचे महत्त्व :** संपादकीय लेख वाचन माणसाला गंभीर विचार करण्याची सवय लावते. वृत्तपत्रातील संपादकीय हे अभ्यासपूर्ण आणि जबाबदार लेखन असते. त्यामुळे व्यक्तीमध्ये बौद्धिक शिस्त निर्माण होते. संपादकीय लेखातून चालू घडामोडींची माहिती मिळते, निबंधलेखन सुधारते, मुलाखतीत आत्मविश्वास वाढतो, स्पर्धा परीक्षांसाठी मदत होते आणि विश्लेषणात्मक विचारसरणी विकसित होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वाचनाला जीवनाचे शस्त्र मानले होते. त्यांनी स्वतः प्रचंड वाचन केले. जगातील अनेक विषयांचा अभ्यास करून त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेचे विश्लेषण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संपादकीय लेख, पुस्तके, संशोधन आणि निरीक्षण यांच्या माध्यमातून समाज समजून घेत होते. म्हणूनच त्यांनी भारतीय समाजातील विषमता ओळखली आणि परिवर्तनाची दिशा दिली. त्यांनी मूकनायक वृत्तपत्र, बहिष्कृत भारत वृत्तपत्र, समता, जनता आणि प्रबुद्ध भारत ही वृत्तपत्रे प्रकाशित करून संपादकीय लेखन केले. त्यांच्या संपादकीय लेखात चौफेर विचार होते. त्यांच्या चिंतन-मंथनातून हिंदू समाजव्यवस्थेतील परिवर्तनाची मोठी प्रक्रिया सुरू झाली. महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजातील जातीय अन्याय निरीक्षणातून ओळखला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यतेची भीषणता अनुभवली आणि अभ्यासातून तिचे मूळ शोधले. त्यामुळे परिवर्तनवादी विचारांची निर्मिती झाली. मोबाईलमुळे वाचन कमी झाले आहे, अशी तक्रार केली जाते. लोक दीर्घ लेख वाचण्यापेक्षा छोट्या व्हिडिओंकडे आकर्षित होत आहेत. त्यामुळे गंभीर विचार करण्याची क्षमता कमी होत आहे. हे अत्यंत घातक आहे. अशा परिस्थितीत संपादकीय लेख वाचन अधिक आवश्यक झाले आहे. कारण ते माणसाला थांबून विचार करायला शिकवते. सोशल मीडिया माहिती देऊ शकतो; पण सखोल विचार देऊ शकत नाही. त्यासाठी पुस्तके, वृत्तपत्रे आणि संपादकीय लेख आवश्यक आहेत. रोज वृत्तपत्र वाचा, संपादकीय लेखाचे विश्लेषण करा, समाजातील घटनांकडे संवेदनशीलतेने पाहा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ‘जन्माला येणारे प्रत्येक मूल हे नवे राष्ट्र असते.’ देशाचे भविष्य युवकांच्या हातात आहे. पण जर युवक फक्त मनोरंजनात अडकून राहिले, तर समाजाचे बौद्धिक नुकसान होईल. युवकांनी दररोज किमान एक संपादकीय लेख वाचण्याची सवय लावली पाहिजे. त्यामुळे त्यांच्यात नेतृत्वगुण, विश्लेषणशक्ती आणि सामाजिक बांधिलकी निर्माण होईल. ■ ■




# बालमनाचा कोमल, करुणामय हुंकार

पुरुषोत्तम संबोधी लिखित ‘सिद्धार्थाचा हंस’ हा बालकुमार कविता संग्रह बुद्ध जयंतीच्या सुमंगल दिवशी प्रकाशित होणे, हीच एक अर्थपूर्ण सांस्कृतिक घटना ठरते. हा संग्रह हातात पडताच मन आनंदाने भरून आले; कारण आजच्या काळात आंबेडकरी आणि बौद्ध वाङ्मय क्षेत्रात बालसाहित्य अत्यंत मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहे. त्या पार्श्वभूमीवर हा संग्रह केवळ स्वागतार्हच नव्हे, तर मौलिकतेची साक्ष देणारा ठरतो. संग्रहाची अर्पणपत्रिका विशेष लक्षवेधी आहे. ‘सिद्धार्थाचा हंस’, ‘कंथक’ आणि ‘नालागिरी’ या प्राणिमित्रांना समर्पित केलेली ही कल्पना अत्यंत अभिनव आणि भावस्पर्शी आहे. बालसिद्धार्थ आणि नंतर मानवतेच्या शिखरावर आरूढ झालेल्या बुद्धांच्या आयुष्यातील या प्राण्यांशी असलेले स्नेहबंध, मेत्ताभावनेची व्यापकता आणि जीवमात्रांप्रती करुणा यांचा उदात्त संदेश या अर्पणातून सहज व्यक्त होतो. या संग्रहातील कविता सिद्धार्थाच्या बालपणापासून बुद्धत्वापर्यंतच्या प्रवासातील विविध प्रसंगांवर आधारित असून, त्या नाविन्यपूर्ण आणि संवेदनशील आहेत. ‘सिद्धार्थ’ आणि ‘देवदत्त’ या प्रारंभीच्या कवितेत ‘सिद्धार्था, सिद्धार्था, हंस दे माझा’ या ओळींतून निर्माण होणारा संघर्ष, त्यामागील स्वामित्वाची भावना आणि त्यावर सिद्धार्थाने दिलेले करुणामय उत्तर, तसेच राजदरबारी झालेला न्यायनिवाडा, हे सर्व हृदयाला स्पर्शून जाते. न्याय, करुणा आणि जीवनमूल्यांची ही शिकवण बालमनावर सहज अलगदपणे कोरली जाते.

‘असित मुनी’ या कवितेत कवीने सिद्धार्थाच्या भविष्याविषयीची कथा मोहक शब्दांत रंगवली आहे. असित मुनी ही ऐतिहासिक व्यक्ती आहे. परंतु त्यांच्या भविष्यवाणी मुळेच बद्ध निर्माण झाले असे म्हणणे अतिशयोक्ती ठरेल. जरी भविष्यकथन विज्ञानाधारित नसले, तरी लोकपरंपरेतून आलेल्या या कथांचा सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेता, त्याचे आधुनिक भान मुलांना देणे आवश्यक ठरते, ही जाणीवही या कवितेमुळे होते. ‘जांभळाच्या झाडाखाली’ या कवितेत ‘श्रमिकांच्या अंगामधून वाहिल्या घामाच्या धारा, सिद्धार्थाचे मन गहिवरले, नको अन्यायाला थारा’ या ओळींतून श्रमिकांविषयीची करुणा आणि अन्यायाविरुद्धची संवेदना अतिशय नाजूकपणे व्यक्त होते. बाल सिद्धार्थाच्या अंतर्मनातील हळवेपणा येथे जिवंत होतो. श्रमिकांच्या श्रमाची अनुभूती पुढे दुःखमुक्तीचा शोध घेण्यास उपयुक्त ठरली असेल. ‘शेतकरी सिद्धार्थ’ या कवितेत ‘सणाचा उत्सव, आनंद घरोघरी सिद्धार्थ प्रतिवर्षी, शेतात नांगर धरी’ या ओळींमधून राजपुत्र असूनही परंपरेप्रती असलेली निष्ठा आणि श्रमसंस्कारांचे महत्त्व अधोरेखित होते. ‘कंथक’ ही कविता तर हृदयाला पिळवटून टाकणारी आहे ‘सिद्धार्थाचा कंथक, चरणी झुकलेला माथा, झाली ताटातूट जिवा, सखा आयुष्याचा होता’ या ओळींतून माणूस आणि प्राणी यांच्यातील नात्याची कोमलता प्रभावीपणे उभी राहते. या कवितेत कवीने कंथकाच्या मनातील भाव आपल्या कवितेत जिवंतपणे उतरविलेले आहे. कंथक केवळ प्राणी नव्हता, तर तो सिद्धार्थाचा जिवलग सुद्धा होता. त्यामुळे प्राण्यांमध्ये सुद्धा मैत्रीचे अनुबंध असतात, त्याचे मुर्तीमंत्र चित्रण येथे झाले आहे. ‘विंचू, नाग, पाली, सरडे, तेही त्याचे मित्र झाले’ ‘अभय अरण्य’ या कवितेतील ओळी आहेत. कवीने सिद्धार्थ हा निसर्गाच्या सानिध्यात कश्या प्रकारे रममाण होत असे, हे अतिशय सुंदररित्या कल्पनेने रेखाटलेले आहे. महाभिनिष्क्रमणानंतर भयान अरण्यातील सिद्धार्थाचे अनुभव चित्रण शब्दबद्ध झालेली ही कविता आहे. ‘सकाळ संध्या रात्र अंधारी मित्रत्वाची वस्त्रे ल्याली’ ही ओळ अलंकारांनी आणि रूपकांनी नटलेली अप्रतिम सौंदर्याची भव्य कल्पनाशक्तीची प्रचिती निर्माण करते. ‘सुजाताची खीर’ कवितेत.. ‘खीर ग्रहणाने ऊर्जा आली, उत्स्फूरले अवघे त्राण सिद्धार्थाचा देह प्रफुल्लित, प्रज्वलित झाला प्राण’ सुजाताच्या खीरदानाचा इतिहास कमीतकमी लयबद्ध शब्दांत अभिव्यक्त करणे ही शब्दांची विलोभनीय जादूच म्हणावी लागते. ‘नालागिरी’ या कवितेत.. ‘मेत्ताभवना अशी असते. शत्रूपेक्षा प्रचंड मोठी मंगलकामनाच्या गाथा विश्व जन मानाच्या ओठी’. उन्मत झालेल्या नालागिरी हत्तीला मैत्रीभावनेनी तथागत कसे शांत करतात. ही मोठी ऐतिहासिक कथा एका छोट्याखानी शब्दालंकारांनी वाचकांपुढे मांडणे हे अभूतपूर्व कौशल्य आहे. उन्मत्त हत्तीला शांत करणारी करुणा ही केवळ कथा नसून, मानवी मूल्यांची पराकाष्ठा आहे. ‘अंगुलीमाल’ कवितेत ‘अंगुलीमाल भिक्खू झाला, बुद्धा चरणी झुकला माथा क्रुरता पूर्णता लीन झाली, बुद्धत्वाची विजयी कथा’ या ओळींतून परिवर्तनाची शक्ती आणि वाणीची प्रभावीता अधोरेखित होते. एवढेच नव्हे, तर हिंसक आणि क्रूर अंगुलीमाल डाकूला अहिंसक भिक्खू बनविणे, ही भारतीय इतिहासातील आणि बुद्धाच्या जीवनातील मेत्ताभावनेतून परिवर्तनाची एक सर्वोच्च क्रांतीकारी घटना ठरते. एकंदरीत, हा संग्रह बालसाहित्यातील एक अमूल्य ठेवा आहे. प्रत्येक कवितेस अनुरूप अशी चित्रे, आकर्षक मुखपृष्ठ आणि साधी, ओघवती भाषा यामुळे हा संग्रह अधिक वाचनीय ठरतो. आजच्या डिजिटल युगात, आभासी दुनियेत हरवलेल्या बालमनाला जर इतिहास, करुणा आणि मूल्यांची ओळख करून द्यायची असेल, तर हा संग्रह अत्यंत उपयुक्त ठरेल. या कविता केवळ यमक जुळवणी नाहीत; त्या शब्दांच्या माधुर्याने आणि आशयाच्या समृद्धीने विविधतेने नटलेल्या आहेत. राजकुमार सिद्धार्थाच्या मुकुटातील हिऱ्यांप्रमाणे या कविता तेजस्वी आणि झळाळत्या वाटतात. कवीची शब्दांवरील पकड अभूतपूर्व आहे. त्यामुळे कमितकमी शब्दांत मोठा आषय मांडणाऱ्या मधाळ, रसाळ आणि मयुरासारख्या सर्वांग सुंदर झाल्या आहेत. हा संग्रह प्रत्येकाने, विशेषतः पालकांनी आपल्या मुलांसाठी अवश्य विकत घ्यावा, जपून ठेवावा आणि वाचावा. कारण हा केवळ कवितांचा संग्रह नाही, तर मूल्यसंस्कारांची आणि बुद्ध इतिहासाची एक सुंदर शिदोरी आहे. ■ ■

ॲड. संघमित्रा बाभळे
मो.98230 53514

कविता संग्रह सिद्धार्थाचा हंस
कवी : पुरुषोत्तम संबोधी
प्रकाशन : समता संगार प्रकाशन, नागपूर

# एका लग्नाची गोष्ट

## नात्यांच्या गुंतागुंतीचा शांत वेध




आजच्या गडबडीत आपण खरेच जगतो आहोत की फक्त निभावतो आहोत? नाती जपतो आहोत की केवळ सांभाळतो आहोत? ग्रामीण असो किंवा शहरी, माणसामाणसांतल्या या न बोलल्या जाणाऱ्या ताणतणावांची जाणीव कधी कधी एखादे पुस्तक करून देते. संध्या दानव यांचा ‘एका लग्नाची गोष्ट’ हा कथासंग्रह अशाच शांत, संयत आणि तरीही नेमक्या शब्दांत आपल्या जगण्याला स्पर्श करणारा आहे. नागपूरच्या आकांक्षा प्रकाशनतर्फे प्रकाशित झालेला हा संध्या दानव यांचा दुसरा कथासंग्रह असून त्यात एकूण अकरा लघुकथांचा समावेश आहे. कुरापती नवरा, रिकामी झोळी, अग्निशिखा, बरखा, एका लग्नाची गोष्ट, झिंग झिंग झिंगाट, झंडू बाम, सावर गं, गंगा, नवसाची शेंडी, बाईची गोष्ट या कथांमधून लेखिकेने ग्रामीण आणि मध्यमवर्गीय जीवनाचे बहुआयामी चित्र अत्यंत जिवंतपणे उभे केले आहे.

या कथा फक्त व्यक्तिकेंद्री नाहीत; त्या माणूस आणि माणूस, तसेच माणूस आणि समाज यांच्यातील नातेसंबंधांचा सखोल वेध घेतात. ग्रामीण जीवनातील दारिद्र्य, पिळवणूक, लाचारी, स्वार्थ, तडजोड, चढाओढ, रुढी-परंपरा आणि त्यातून घडणारी मानसिकता या सगळ्याचे वास्तवदर्शी चित्रण कथांमध्ये प्रकर्षाने जाणवे. लेखिका वास्तवातील पात्रे, प्रसंग आणि वातावरण यांचा आधार घेत दृश्यात्मक आणि भावनाशील अभिव्यक्ती घडवतात. आजच्या स्त्रीलेखनाच्या पार्श्वभूमीवर संध्या दानव यांची लेखनदृष्टी विशेष ठरते. त्या पुरुषप्रधान व्यवस्थेविषयी आक्रोश व्यक्त करत नाहीत; उलट, अत्यंत संयमित, शांत आणि तटस्थ भूमिकेतून स्त्रीजीवनातील वेदना, घुसमट आणि भावविश्व मांडतात. ही संयत अभिव्यक्तीच त्यांच्या लेखनाची खरी ताकद ठरते. ‘कुरापती नवरा’ ही कथा संग्रहातील विनोदी अंग ठळक करणारी. भुजंगराव जगदाळे या गावातील स्वयंघोषित पुढाऱ्याच्या स्वैर वृत्तीवर केलेले खुमासदार भाष्य वाचकाला खळखळून हसवते. संध्या दानव यांच्या लेखनातील विनोदाची धार येथे स्पष्टपणे जाणवते. खरे तर विनोदी लेखन प्रकारात स्त्रिया फार कमी लिहितात. पण संध्या दानव यांनी या प्रकारात यापुढेही लेखन करावे अशी शैली त्यांच्याजवळ आहे. दुसरीकडे, ‘रिकामी झोळी’ ही कथा अंतर्मुख करते. वृद्ध आई-वडिलांच्या आयुष्यातील पोकळी, मुलाकडून मिळणारा दुरावा आणि नात्यांमधील उपरेपण या भावनांचे अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण या कथेतून उभे राहते. लेखिकेने कथांमध्ये वापरलेल्या म्हणी आणि वाक्यप्रचार कथांना अस्सल ग्रामीण ढंग देतात.

*‘फुकटची कढी आणि धावू धावू वाढी’,*
*‘अडला नारायण गाढविनीचे पाय धरी’,*
*‘येडा बनून पेढा खाणे’*

अशा भाषिक वैशिष्ट्यांमुळे कथा अधिक जिवंत, अधिक आपल्यासारख्या वाटतात. या कथासंग्रहाला डॉ. गिरीश सपाटे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. कथांमधील स्त्री-पुरुष नात्यांच्या गुंतागुंतीचा त्यांनी वेध घेतला आहे. लेखिकेचे बालपण देऊळगाव मही या खेड्यात गेल्यामुळे शेतीमातीशी असलेले तिचे नाते आणि ग्रामीण जीवनाचा जवळून घेतलेला अनुभव कथांमध्ये प्रकर्षाने उमटतो. एकूणच, ‘एका लग्नाची गोष्ट’ हा कथासंग्रह केवळ ग्रामीण जीवनाचे चित्रण करत नाही, तर माणसामाणसांतल्या नात्यांच्या सूक्ष्म हालचाली उजागर करतो. या कथांमध्ये मोठे घोषवाक्ये नाहीत, आक्रोश नाही; आहे ती फक्त शांतपणे व्यक्त होणारी वेदना, हलकेसे स्मित आणणारा विनोद आणि मनात नकळत साचत जाणारी जाणीव. वाचून झाल्यावर या कथा आपल्याला सोडून जात नाहीत. त्या आपल्या सोबतच राहतात. आपल्या घरात, आपल्या नात्यांत, आपल्या विचारांत. कदाचित म्हणूनच या कथा वाचताना आपण फक्त वाचक राहत नाही, तर त्या जगण्याचा एक भाग होऊन जातो. आजच्या गोंगाटात, मोठ्याने बोलणाऱ्या शब्दांच्या गर्दीत, संध्या दानव यांची ही शांत, संयमित आणि प्रामाणिक अभिव्यक्ती वेगळीच भासते आणि म्हणूनच लक्षातही राहते. यासाठी त्यांचे अभिनंदन आणि पुढील लेखनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा! ■ ■



डॉ. लीना निकम
9881669345



काव्यफुले
संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225
बहुजन सौरभ

## सनातन अक्षय हा धम्म खरा

बुद्धाच्या मार्गाने जाऊ चला, बुद्ध विहारात एकत्र येऊ चला बुद्धाची
करुण, वंदना, पंचशील म्हणून चला बुद्धाचा `समतेचा'मार्ग आचरू
चला.. 1.
बुद्धाच्या मार्गाने.. मनाला शुद्ध करण्या अष्टांग मार्ग तो धम्माला संघाला
मनात साठविती सन्मार्गाने समाजात नैतिकता राखतो नैतिक समाज
निर्माण करू चला. 2.
बुद्धाच्या मार्गाने. अंधश्रद्धेचा हा सारा भोंगळ पसारा सम्यक स्मृति
जागवून दूर करा अनित्यतेचा बोध जागवू चला बुद्धाच्या वचनाला
अंगीकारू चला.. 3.
बुद्धाच्या मार्गाने परस्परात सम्यक मैत्री जागवू चला जगाला `युद्ध नव्हे
बुद्ध हवा' सांगू चला परस्परात वैरभावना नष्ट करू चला
बंधूता बुद्धाच्या करुनेने जागृत करा. 4.
बुद्धाच्या मार्गाने `स्नेह प्रेम' वाढवीण्या मार्ग धम्मा सम नसे दुसरा अत्तदीप
पेटवून विषमता ती दूर करा, धम्मआचरणाची ती कास फरा,
सनातन अक्षय धम्म आहे हा खरा..5.
बुद्धाच्या मार्गाने

- इंजि. शुध्दोधन बडवणे

## आईच्या कुशीत



आई तुझ्या कुशीची, काय सांगू महती,
तुझ्या कुशीतील सुख,
नाही जगाच्या पाठीवर
आई तुझ्या कुशीत, वाटे रहावे पडून,
मिळे मज ती ऊब, नाही जी गोधडीत
आई तुझ्या कुशीचा, गारवा काय वर्णू,
नाही त्याची सर, निसर्गाच्या संगतीत
आई तुझ्या कुशीत, मिळे मज जी शांती,
नाही शांती ऐसी, देवाच्या देव्हाऱ्यात
आई तुझ्या कुशीत, मज लागे ऐसी निद्रा,
मिळेना मजला ती, लिंबाच्या झोपाळ्यात
आई तुझ्यामुळेच, जग मी हे पाही,
वंदेन तुजला मी, ईश्वराचे ठायी

- चंद्रकांत सावळकर



## हे असे रेकॉर्ड ?

सिमेंट-काँक्रीटचे हे शहर
रस्ते उंचावले, घरे खालावली
माणसाचे मन दगड झाले
आणि,
माणुसकी ठेंगणी झाली !
सिमेंट-काँक्रीटचे हे शहर
महिलांविरोधी गुन्ह्यात देशात सातवे
विनयभंगात चौथे
अल्पवयीन मुलींवरील अत्याचारात
तिसरे
लैंगिक छळवणुकीत तिसरे
महिलांचा पाठलाग करण्यातही
हे शहर आता अजिबात मागे नाही
उड्डाणपुलांचे हे शहर यातही
देशात तिसऱ्या क्रमांकावर...
सिमेंट-काँक्रीटचे हे शहर
गुन्ह्यांच्या गुणवत्ता यादीत
आता अव्वल क्रमांकावर आले
सत्तेच्या रिमोट कंट्रोलचे हे शहर
महिलांसाठी असुरक्षित म्हणून
हे असे, नकोसे
अनेक रेकॉर्ड कायम केले !!!

- महेंद्रकुमार मेश्राम

## विद्रोही वादळ

आले विद्रोही ते वादळ
मला कधीच नाही भय।
झेलतो तयास छातीवर
हाती जिवंत धरून हृदय।।
भीमच माझे शस्त्र आहे
त्या ज्योतीबाचा विश्वास।
येई धाऊन तुफानही जरी
तरी घेतो सुखाने श्वास।।
स्वातंत्र्य समता न्यायानी
नांदावे खरा बंधूभाव जनी।
निळ्या नभी तेव्हाच शोभेल
ही निळाईने आपली धरणी।।
अन्याय आणि तो अत्याचार
का कळला नाही अजून कुणा।
अरे आपले संविधान आहे
तुझा माझा आशिष कणा।।
भारत माझा देश आहे असे
स्वाभिमानाने सदा सांगतो।
ज्या मातीत जन्मलो वाढलो
त्याच मातीला आई मानतो
ती गंगा जरी वाहे वेडिपीशी
स्थितप्रज्ञ झाला तो हिमालय
गोदेलाही तेव्हा सांभाळूनी
सह्यांद्रीने दिले रक्षा वलय।।
हे विद्रोही वादळ विचारांचे
आता कुठे थांबणार नाही।
माणूस माणसापरी जोवरी
या समाजात वागणार नाही।।

- गोवर्धन तेलंग

## अजिंक्य आई



कूज बारगी
बुडता
बाळ मिठीत
झोपला
घट्ट बिलगली
आई
कसा निसर्ग कोपला
जबलपूरला सारे
गेले सुट्ट्याना लागता
पर्यटन थंड स्थळी
मृत्यू मिळे न मागता
हार अमान्य मातेला
वाटे जिंकलाय काळ
सैल मातृत्व सुटेना
झाली दुर्घटना काल
मरणाच्या दारी तिज
चिंता पोटच्या गोळ्याची
डोळे मिटले पाण्यात
नाळ तुटली भोळ्याची
प्रेम जननीचे खरे
पुन्हा सिद्ध झाले आता
चिमुकला विसावला
स्वर्गसुख कुशी जाता
प्रित निर्मळ निःस्वार्थी
माय देई सुख छत्री
श्वास देण्यास लेकरा
जगण्याला लावी कात्री
गोताखोर अश्रू वाहे
दिसे माऊलीची माया
म्हणे जणू ओढू नका
कोमलच शिशु काया
पडे नदित मैरीना
उभे अकाली मरण
पिल्लू जहान छातीशी
गेली मृत्यूला शरण

- डॉ.शील बागडे

## माणसाच्या क्रूरतेचा कळस



भय इथले संपत नाही
चहुबाजूंनी तिला घेरले पार
कोवळ्या कळ्यांना खुडण्याचा
नराधमांनी केला कळस पार
कुणाच्या पोटचा काळजाचा तुकडा
याने त्यावरही केला वार
हिरकणीचा बुरूज ही
ढासळतो मग आरपार
सर्रास इथे गिधाडे
तुटून पडतात तिच्यावर
प्रश्न पडतो तिला, मग
कोणता गड करावा सर
सल उठते काळजात वेदनांची
लढावे तरी कुठं कुठं
बांध तुटतो मनाचा आणि
कशी बांधावी मजबूत वज्रमुठ
वैशाख वणव्यापरी मन
तिचे होरपळते
पर स्त्रीला मातेसमान
कोण इथे संबोधते
सन्मानाने जीवन जगण्या
दिधले डॉ आंबेडकरांनी हक्काचे
संविधान तिला
पण इथल्या माणूसकीचा
अंत आज झाला

- मंदाकिनी काकडे

## धार लेखणीची

अन्यायाची तलवार माझ्या, हृदयाला छेढल्यावर
लेखणीतून शब्द माझे बाण बनुनी छेदल्यावर...
भांडलो मी अन्यायाशी
लेखणीच्या जोरावर
गुलामगिरीची साखळी
तोडून शब्दांच्या त्या मारावर...
विषमतेचे विष फेकूनी समता, स्वातंत्र्य, बंधुता दिली न्यायाच्या बळावर
आमिषाला बळी ना पडली
सिंहासम गुरगुरलो
शिक्षणाच्या जोरावर...
शब्दांची धार पाजळून
वार विषमतेवर केला
मनूचा अहंकार जाळला रायगडच्या पायथ्यावर...
दृष्ट रूढीला चिरणारी क्रांती अहिंसेच्या मार्गावर
असा एकच बाबासाहेब भीमराव आंबेडकर

- ज्योत्सना बन्सोड

## येते भोंदूचे पीक भरात...

घायाळांचा तो शोक-संदेश ऊरात आहे..
संकट मोचनी ही-वेड्यांची वरात आहे..
लावे गळास तेच-गवसे रसाळ मांसे..!
जाळ तवाच फेके-सागर भरात आहे. ?
कुणाचे दोष ते-बांधे पोशिंदे गंडे दोरे. ?
नेतेच अंधाळू बोंबा-मुक्या सुरात आहे..
अवतार मी भोगीनींचा-तुच माझी राधा.!
हे गुपित कानी ठेव-कामांध सौराट आहे..
किती जागवावे येते-भोंदूचे पीक भरात. ?
पुन्हा जाळ्यात शिकार-हाच आघात आहे..
घायाळांचा तो शोक-संदेश ऊरात आहे..
संकट मोचणी ही-वेड्यांची वरात आहे..

- दिनकर रा मडकवाडे

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प १४१



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूयाड. ता. कुही. जि.नागपूर

कुही तालुक्यात शेतकरी आणि शेत. मजूर मोठ्या संख्येने राहतात. नागपूर शहरा जवळ हा तालुका आहे. रुयाडे येथे बौद्ध बांधव राहतात आणि विविध कार्यक्रम घेत असतात त्यामुळे सांस्कृतिक आणि इतरही प्रबोधन विचार ऐकण्यासाठी आजूबाजूच्या परिसरातील लोक येत असतात. बाबासाहेबांना वंदन करतात.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
9370773608

# विहार धम्म चळवळीची केंद्रे व्हायला हवीत : भन्ते हर्षदीप



**नागपूर :** बुद्ध जयंतीच्या निमित्ताने खामला येथील त्रिसरण बुद्ध विहारात आयोजित 'बुद्ध जयंती'च्या पर्वावर, अनेक सामाजिक व शैक्षणिक चळवळीत कार्यरत असलेले भन्ते हर्षदीप यांनी अतिशय सौम्य वाणीतून व अत्यंत प्रभावीपणे धम्मदेशना दिली. बोलताना ते म्हणाले, 'धम्म ही अतिशय आदर्श जीवनपद्धती आहे. धम्म हा केवळ विशिष्ट जातीसाठी व समुदायासाठी नसून तो सर्वांसाठी आहे. तथागतांच्या बहुजन हिताय, बहुजन सुखाय या संकल्पनेवर आधारित धम्म विवेकनिष्ठा शिकवितो. बुद्ध हे नाव नसून ती एक अवस्था आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक धर्मांचा सखोल अभ्यास केला आणि आयुष्याच्या अंतकाळी अतिशय परिणातप्रज्ञ व प्रगल्भ, परिपक्व अवस्थेत त्यांनी बुद्ध धम्म स्वीकारला. त्यांनी जनसामान्यांपर्यंत अतिशय शुद्ध स्वरूपात बुद्ध पोचविला आहे. आज प्रत्येक नगरात, उपनगरात व गावोगावी विहारे निर्माण झाली आहेत...होत आहेत.. मात्र केवळ तीन-चार प्रसंगानेच विहारांमध्ये चहल पहल दिसते, असे व्हायला नको. विहारातून निरंतर धम्माचा, आंबेडकरी विचारांचा प्रसार व्हायला हवा. खरेतर प्रत्येक विहार धम्म चळवळीचे केंद्र व्हायला हवे. त्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारत बौद्धमय होण्याचे जे स्वप्न पाहिले ते पूर्ण होण्यास मदत होईल. दर रविवारी विहारातून नव्या पिढीसाठी काही उपक्रम राबविले गेले पाहिजेत. ज्यातून उमलत्या पिढीवर धम्माचे संस्कार होतील. कोणतेही बौद्ध स्त्री-पुरुष समाजात आपल्या वेगळेपणाने उठून दिसायला हवेत, यासाठी सतत चिंतन, मंथन व प्रबोधन होणे गरजेचे आहे.

डॉ. बाबासाहेबांच्या प्रत्येक जीवनाचा, त्यांच्या प्रत्येक निर्णयाचा अगदी सूक्ष्म अभ्यास सुद्धा व्हायला हवा. वैचारिक एकवाक्यतेसाठी व धम्माच्या प्रचारासाठी प्रत्येक बौद्ध व्यक्तीने संघटित होऊन, अहंकार रहित वर्तन अपेक्षित आहे.' त्रिसरण बुद्ध विहारात मोठ्या संख्येने उपस्थित उपासक आणि उपासिकांनी भंते हर्षदीप यांच्या धम्मदेसनेला प्रचंड प्रतिसाद दिला. जवळपास दोन तासाच्या या प्रवचनानंतर सांगता झाली. प्रारंभी भंते हर्षदीप यांच्या पुढाकाराने बुद्ध वंदना घेण्यात आली. कार्यक्रमाचे संयमीत संचालन कमलेश कळमकर यांनी तर आभार प्रज्ञा घुटके यांनी मानले. यावेळी त्रिशरण सेवा समितीचे अध्यक्ष एस. एम. शेंडे, सचिव घनश्याम फुसे, उपाध्यक्ष पी. आर. नगरकर, सहसचिव अनिल भांगे, कोषाध्यक्ष पी. एस. मेश्राम, सर्व सदस्य तसेच प्राचार्य डॉ. अजय चिकाटे, सुभाष हाडके, संजय कांबळे, मुनिंद्र पाटील, पंकज शेंडे, अभिजित ओरके, योगेश घुटके, विकास लोखंडे, प्रफूल लिहीतकर, सुषमा फुसे, मंजुषा कांबळे, मनीषा ढोके, माधवी इंगळे, यासोबत परिसरातील अनेक आबालवृद्ध व गणमान्य नागरिक धम्मदेसनेसाठी उपस्थित होते.

# प्रशिक बुद्ध विहार, साहूनगर येथे भगवान बुद्ध मूर्तीचे अनावरण




**नागपूर :** साहूनगर परिसरातील प्रशिक बुद्ध विहार येथे भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीचे अनावरण सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. मुकूंद मेश्राम यांनी भूषविले, तर भदंत संघरत्न माणके यांच्या हस्ते मूर्तीचे अनावरण करण्यात आले.

यावेळी भदंत संघरत्न माणके यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, तृष्णा व स्वार्थामुळे मानव विकृत होतो, तर सेवा व त्यागाच्या भावनेतून समाजात सुख व समाधान निर्माण होते. पंचशील हा विशुद्धीचा मार्ग असून दहा पारमिता हा सदाचाराचा मार्ग आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात विविध मान्यवरांनी सामाजिक विषयांवर आपले विचार मांडले. प्रा. डॉ. युवराज मेश्राम यांनी महागाई, भ्रष्टाचार व बेरोजगारी यांसारख्या ज्वलंत प्रश्नांवर भाष्य केले. सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी रामभाऊ आंबुलकर यांनी आंबेडकरी सामाजिक समतेच्या संघर्षात योगदान देणे ही आनंदाची बाब असल्याचे नमूद केले.

यावेळी राजकुमार वंजारी, ॲड. सौरभ राऊत, नरेंद्र तितरे, नगरसेवक बाबा बोकडे आदींनी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बिहारी लांडे यांनी केले, संचालन दीपक आंबुलकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मंदा पाटील (सरपंच व शिक्षिका) यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गौतम चव्हाण, अजय शेंडे, लक्ष्मण लोखंडे, केवल लांजेवार, शीलवन गजभिये, सरोज माटे, सुनिता लांडे, सुंदरलाल पाटील, सिद्धार्थ घोडेस्वार, सुजाता बन्सोड, पुष्पा गायकवाड, प्रियंका डांगे, ज्योती लांजेवार आदींनी सहकार्य केले.

## महत्वाचे

### ICSE दहावी परीक्षेत सिमरन दवे हिला 94 टक्के गुण : घवघवीत यश



**नागपूर :** सेंट. हेलेनाज स्कूल येथील सिमरन दवे हिने ICSE दहावी बोर्ड परीक्षा 2026 मध्ये उत्कृष्ट 94 टक्के गुण संपादन करून शाळा, शिक्षक आणि आपल्या कुटुंबाचा गौरव वाढविला आहे.

सिमरन ही सातत्यपूर्ण गुणवंत विद्यार्थिनी असून तिने नेहमीच आपल्या वर्गातील अव्वल पाच विद्यार्थ्यांमध्ये स्थान कायम राखले आहे. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत असतानाच तिने क्रीडा आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. फुटबॉल खेळात सक्रिय सहभागासोबतच विविध मॉडेल युनायटेड नेशन्स (MUN) परिषदांमध्ये तिने विविध देशांचे प्रतिनिधित्व केले आहे. तसेच अनेक स्ब्ह कार्यक्रमांमध्ये Secretariat Member म्हणून जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत नेतृत्वगुणांचे दर्शन घडविले आहे. जागतिक करिअरच्या दृष्टीने ती जपानी भाषा देखील शिकत असून आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करण्याची तिची तयारी सुरू आहे. समाज आणि पर्यावरणाच्या कल्याणासाठी कार्य करण्याची तीव्र इच्छा असलेल्या सिमरनचे भविष्यात United Nations मार्फत भारताच्या Human and Sustainable Development उद्दिष्टांमध्ये योगदान देण्याचे मोठे स्वप्न आहे. सिमरन दवे हिच्या या उल्लेखनीय यशामागे तिचे वडील विनय दवे आणि आई ज्योती दवे यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

### हलाखीच्या परिस्थितीवर मात करत कलश चौधरी दहावी उत्तीर्ण



**नागपूर :** बहुजन हिताय विद्यार्थी वसतिगृह येथील विद्यार्थी कलश मधुकर चौधरी याने दहावीच्या परीक्षेत 44 टक्के गुण मिळवत यश संपादन केले आहे. कलश हा सावनेर तालुक्यातील खानगाव येथील रहिवासी असून त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. कोरोना काळात वडिलांचे निधन झाल्यानंतर त्याचे शिक्षण थांबण्याची वेळ आली होती. त्याची आई मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. अशा कठीण परिस्थितीत कलशने इयत्ता आठवीत बहुजन हिताय विद्यार्थी वसतिगृहात प्रवेश घेतला. वसतिगृहातील नियमित अभ्यास, मार्गदर्शन आणि शिकवणीच्या मदतीने त्याने दहावीची परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली. पुढील शिक्षणही वसतिगृहात राहून पूर्ण करण्याची त्याची इच्छा असून त्याच्या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### बहुजन हिताय वसतिगृहातील मोहित माटे दहावीत यशस्वी



**नागपूर :** बहुजन हिताय विद्यार्थी वसतिगृह येथील विद्यार्थी मोहित बबन माटे याने दहावीच्या परीक्षेत 51.20 टक्के गुण मिळवत यश संपादन केले आहे. मोहित हा भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील ईसापूर (पो. मांगली) येथील रहिवासी असून तो इयत्ता नववीमध्ये वसतिगृहात दाखल झाला होता. त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून आई-वडील मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात. गावात केवळ चौथीपर्यंत शाळा असल्याने पुढील शिक्षणासाठी त्याला पवनी येथे जावे लागत होते. अडचणींवर मात करत मोहितने कठोर परिश्रमाच्या जोरावर दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली असून त्याच्या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### हरीश पाटील यांना 'महात्मा फुले समाजभूषण पुरस्कार' प्रदान



**नागपूर :** युवा वक्ते हरीश पाटील यांना सामाजिक व वैचारिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'महात्मा फुले समाजभूषण पुरस्कार' प्रदान करून सन्मानित केले हा पुरस्कार मुख्य संयोजक नागमित्र धर्मेश पाटील, भन्ते सोमानंद इंटरनॅशनल नेटवर्कचे राष्ट्रीय प्रभारी शरद चोपेकर तसेच रायगड-महाड येथील गौतम कांबळे, संघटन प्रमुख प्रबुद्ध भारत राष्ट्रीय संघ यांच्या हस्ते प्रदान केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी हरीश पाटील यांच्या प्रभावी वक्तृत्वशैलीचे, सामाजिक जनजागृतीतील योगदानाचे आणि बहुजन समाजासाठी केलेल्या कार्याचे कौतुक केले. पुरस्कार स्वीकारताना हरीश पाटील यांनी समाजपरिवर्तनाच्या कार्यासाठी अधिक जोमाने कार्यरत राहण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमास विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



# अंधश्रद्धा निर्मूलन व व्यसनमुक्ती उपक्रमातून विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन

**नागपूर :** नव शक्ती विद्यालय येथे आदिम संशोधन अध्ययन मंडळ आणि अस्तित्व क्रिएशन उत्कर्ष बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी अंधश्रद्धा निर्मूलन व व्यसनमुक्ती विषयक विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या वेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष तथा नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक गौरव आळणे यांनी विविध वैज्ञानिक प्रयोगांचे सादरीकरण करून अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि फसवणुकीचे प्रकार विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविले. तसेच व्यसनमुक्तीबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक प्रकाश निमजे व गुणवंत ट्युशन क्लासेसचे मोहन सोनकुसरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन हरेश निमजे यांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, आत्मविश्वास आणि स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण होत असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.

# गडचिरोलीच्या श्री गुरुदेव व्यायाम शिक्षण सेवा मंडळाला राज्यस्तरीय ग्रामजयंती पुरस्कार




**गडचिरोली :** श्री गुरुदेव व्यायाम शिक्षण सेवा मंडळ या संस्थेला राज्यस्तरीय उल्लेखनीय संस्था ग्रामजयंती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्री गुरुदेव सेवा मंडळ तर्फे नागपूर येथे आयोजित कार्यक्रमात आमदार प्रविण दटके आणि अभिजीत वंजारी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला.

संस्था गेल्या अनेक वर्षांपासून आदिवासी व दुर्गम भागात शिक्षण, संस्कारवर्ग, आरोग्य शिबिरे तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करीत आहे. दिवंगत समाजसेवक डॉ. शिवनाथ कुंभारे यांच्या प्रेरणेने संस्था विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे.

# बनावट फेसबुक आयडीवरून महापुरुषांची बदनामी; ॲट्रॉसिटी अंतर्गत कारवाईची मागणी



**गोंदिया :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह इतर समाजसुधारकांविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करून बदनामी केल्याचा गंभीर प्रकार गोंदिया जिल्ह्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी सडक अर्जुनी तालुक्यातील कोसमतोंडी येथील गौरेश बावनकर यांच्यावर ॲट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्यात यावी, अशी जोरदार मागणी बौद्ध समाजबांधवांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 'दिनेश ब्राह्मणकर' या नावाने बनावट फेसबुक आयडी तयार करण्यात आला होता. या बनावट आयडीवरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच इतर महापुरुषांविषयी आक्षेपार्ह छायाचित्रे, अवमानकारक लिखाण आणि अर्वाच्य भाषेचा वापर करून पोस्ट टाकण्यात आल्या होत्या. त्यामुळे बौद्ध समाजाच्या भावना तीव्रपणे दुखावल्या गेल्या असल्याचे समाजबांधवांनी म्हटले आहे. हा प्रकार लक्षात आल्यानंतर काही युवकांनी रोशन बडोले यांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर दि. 6 मे रोजी रोशन बडोले, विदेश टेंभुर्णे, अस्लेश अंबादे, रूपचंद खोब्रागडे, कुणाल बडोले आणि राजेश फुले यांनी डुग्गीपार पोलिस स्टेशनमध्ये धाव घेत लिखित तक्रार दाखल केली. संबंधित डुप्लिकेट आयडी तयार करून महापुरुषांची बदनामी करणारा व्यक्ती कोण, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली होती.

डुग्गीपार पोलिसांनी प्राथमिक चौकशी केल्यानंतर संबंधित बनावट आयडी तयार करून आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित करणारा गौरेश बावनकर असल्याची माहिती समोर आल्याचे तक्रारदारांनी सांगितले. त्यानंतर शुक्रवारी (दि. ८) शेकडो बौद्ध समाजबांधवांनी डुग्गीपार पोलिस स्टेशनवर धडक देत निषेध व्यक्त केला. यावेळी उपस्थितांनी आरोपीवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी, अशी ठाम मागणी केली. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही समाजबांधवांनी प्रशासनाला दिला आहे.

# महा. अंनिसची रामटेक शाखा पुनर्गठित

**भंडारा :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची रामटेक शाखा नुकतीच पुनर्गठित करण्यात आली. या प्रसंगी केंद्रीय निरीक्षक म्हणून राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे व जिल्हा कार्याध्यक्ष चित्तरंजन चौरे उपस्थित होते. या शाखेचे मुख्य सल्लागार म्हणून जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रा. ओमप्रकाश आष्टणकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली, अध्यक्ष नानाभाऊ उराडे तर कार्याध्यक्ष म्हणून कांचनमाला माकडे यांची निवड करण्यात आली. इतर नवपदाधिकारी येणेप्रमाणे.. उपाध्यक्ष मनोहर भगत, प्रधान सचिव - मोहन कोठेकर, सहसचिव - नंदकिशोर पापडकर, बुवाबाजी संघर्ष विभाग कार्यवाह - अजय खेडकर, वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प पुष्पा वाघुलकर, वार्तापत्र प्रकाशन विभाग कार्यवाह - नत्थुजी घरजाळे, महिला सहभाग कार्यवाह - सुरेखा उराडे, विविध उपक्रम कार्यवाह - वेणुधर भिमटे, जातीअंत विभाग - सतीश नवकरकर, सोशल मीडिया - कार्तिक उराडे, सांस्कृतिक विभाग कार्यवाह - चंद्रशेखर जिभे, प्रशिक्षण विभाग कार्यवाह - कविधर खडसे, मानसिक आरोग्य विभाग कार्यवाह - आश्विन, इत्यादी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सभेची कार्यवाही नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष चित्तरंजन चौरे यांनी पार पाडली तर वर्षा टेंभेकर यांनी संविधान उद्धेशिकेचे वाचन केले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची उद्दिष्टे व कार्यपद्धती यावर राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी विस्तृत माहिती दिली. नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचे नागपूर जिल्हा पदाधिकाऱ्यांद्वारे वार्तापत्र पुस्तके व माहीती पत्रके देऊन स्वागत करण्यात आले. नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा देताना प्रा. पुष्पा घोडके म्हणाल्या की, भारतीय घटनेच्या कलम 51ए प्रमाणे अंधश्रद्धा निर्मूलन करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे व हे महत्वाचे कार्य आपल्या हातून उत्तम प्रकारे होवो त्यासाठी तुम्हाला मी हार्दिक शुभेच्छा देते. प्रा. डॉ. ओमप्रकाश आष्टणकर यांनी आभार मानले. यावेळी शहरातील प्रताप येरपुडे आणि अनेक जेष्ठ मान्यवर उपस्थित होते.

# नंदनवन येथे योगसंस्कार शिबिराचा 26 वा वर्धापन दिन साजरा




**नागपूर :** नंदनवन येथील जवाहर योगसाधना व आरोग्य केंद्राचा 26 वा वर्धापन दिन आणि ज्येष्ठ योगतज्ज्ञ डॉ. विठ्ठलराव जिभकाटे यांच्या 98 व्या वाढदिवसानिमित्त आयोजित सात दिवसीय योगसंस्कार शिबिराचा समारोप उत्साहात पार पडला. या शिबिराचे उद्घाटन माजी उपमहापौर तसेच जवाहर विद्यार्थी गृहाचे अध्यक्ष शेखर सावरबांधे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ॲड. जगदीश गायधने यांनी भूषविले होते. संपूर्ण शिबिरात विविध विषयांवर तज्ज्ञ डॉक्टर व योगप्रशिक्षकांनी मार्गदर्शन करत सहभागींच्याकडून प्रात्यक्षिके करून घेतली.

या शिबिरात प्रा. मीना देशमुख, योगशिक्षक पंकज बांते, डॉ. पियूष नाशिककर, डॉ. संजय खोंडे, डॉ. जीवेश पंचभाई, योगाचार्य गंगाधर पोडल्यावार, डॉ. मीताली स्वप्नील कढेकर, डॉ. धनलाल शेंडरे यांनी योग, प्राणायाम, ध्यान, मुद्रा आणि शुद्धीक्रिया यांचे महत्त्व सांगितले. निरोगी शरीर आणि मानसिक स्वास्थ्यासाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

समारोप कार्यक्रमात 26 व्या वर्धापन दिनाचा अहवाल कमलाकर हटवार यांनी सादर केला. कार्यक्रमात महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमा या पार्श्वभूमीवर प्रा. डॉ. रमेश पिसे यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला पतंजली योग समितीचे राज्य प्रचार प्रमुख डॉ. जीवेश पंचभाई, भारत स्वाभिमानचे डॉ. अविनाश कोकाटे, लोकेश भुरे, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. योगशिक्षक व स्वयंसेवकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन घनश्याम कातोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन विजय लांबट यांनी मानले.

# निधन वार्ता

### अनुसयाबाई धांडे



**नागपूर :** अनुसयाबाई धांडे यांचे निधन. कुही, (नागपूर)तालुक्यातील मांगली येथील गुलाबराव धांडे यांच्या मातोश्री शेतकरी कुटुंबातील अनुसयाबाई धांडे वय 87 वर्षे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी अनेक वेळा 'वेगळ्या विदर्भाच्या आंदोलनात' भाग घेतला. त्यांच्या मागे गुलाबराव धांडे, अश्विन धांडे, विलास धांडे असे तीन मुले व मंदा बांडेबुचे मुलगी, सुना, नातू असा मोठा आप्त परिवार आहे.

### नारायण धनविजय



**नागपूर :** प्लॉट नं. 86, नालंदा नगर, नागपूर-27 येथील रहिवासी नारायण उपासराव धनविजय वय 78 वर्षे यांचे 08/05/2026 ला निधन झाले. त्यांचेवर 09/05/2026 रोजी मानेवाडा घाटावर अंतिम संस्कार करण्यात आले.



# कळमेश्वरात बुद्ध जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**कळमेश्वर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती मंडळ, कळमेश्वर यांच्या वतीने बुद्ध जयंतीनिमित्त बाबासाहेब केदार शेतकरी सभागृह येथे विविध धार्मिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदवला.

सकाळच्या सत्राची सुरुवात कृष्णाजी शेंडे यांच्या बुद्ध वंदनेने झाली. त्यानंतर डॉ. राजेंद्र ढवळे यांनी विपश्यना आणि ध्यानसाधनेचे मार्गदर्शन करत उपस्थितांना प्रबोधन केले.

नंतरच्या सत्रात दिपक तागडे यांच्या मार्गदर्शनाखाली नृत्य, गायन आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धांमध्ये युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

सायंकाळच्या सत्रात भिक्खू ज्ञानरत्न महाथेरो आणि प्राचार्य डॉ. मनोहर नाईक यांनी धम्मप्रबोधन करत बुद्ध विचारांचा संदेश दिला. यावेळी निबंध स्पर्धेचे निकाल जाहीर करण्यात आले. रागिणी अजय ढोले हिने प्रथम, दिव्या सुनील टेकाडे हिने द्वितीय, तर इच्छा रवींद्र भगत हिने तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना मंडळाच्या वतीने रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन चार्वाक खैरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कृष्णाजी शेंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे सदस्य राम बुरबुरे, मेघश्याम ठमके, नेतराम राऊत, युवराज शेंडे, शिशुपाल मडके, शिशिर बनसोड, चुडामन ऊके, हरिदास इंगळे यांनी सहकार्य केले.

# 'माता भिमाई आंबेडकर' संशोधन प्रकल्पासाठी 'बार्टी'कडून माहिती देण्याचे आवाहन

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्या वतीने 2025-26 या वर्षासाठी 'माता भिमाई आंबेडकर - जीवन संघर्ष व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जडणघडणीतील योगदान - एक अभ्यास' या शीर्षकाचा संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

या संशोधन प्रकल्पाची गुणवत्ता आणि व्याप्ती वाढवण्यासाठी बार्टी संस्थेच्या संशोधन विभागामार्फत समाजातील विविध घटकांकडून माहिती मागवण्यात येत आहे. या विषयाबाबत माहिती असणारे संशोधक, अभ्यासक, विचारवंत, कार्यकर्ते आणि नागरिकांनी आपल्याकडे असलेली माहिती उदा. मौखिक माहिती, कागदपत्रे, लेख, शोधनिबंध, ग्रंथ इत्यादी उपलब्ध करून देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित माहिती 31 मे पर्यंत बार्टी संशोधन विभागाच्या researchbartiw®ww@gmail.com या ई-मेलवर अथवा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), 28, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - 411001' या पत्त्यावर टपालाने पाठवता येईल. तसेच, ही माहिती प्रत्यक्ष कार्यालयात येऊनही सादर करता येईल. आपण उपलब्ध करून दिलेली माहिती योग्य संदर्भासह या प्रकल्पामध्ये सन्मानपूर्वक समाविष्ट केली जाईल.

या प्रक्रियेसाठी येणारा झेरॉक्स, टपाल, प्रवासभाडे किंवा इतर कोणताही खर्च संस्थेमार्फत दिला जाणार नाही. जास्तीत जास्त अभ्यासकांनी या महत्त्वपूर्ण कार्यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन बार्टी संस्थेच्यावतीने केले आहे.

# जयभीमनगर रामेश्वरी येथे प्रबोधनासोबतच एकात्मतेचा संदेश



**नागपूर :** जयभीम नगरात बुद्ध जयंती उत्सव समितीच्यावतीने महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत बुद्ध यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. परिसरात उत्साहाचे आणि सामाजिक एकतेचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने झाली. ही वंदना भंते यांनी केली. यानंतर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर जिल्हा सांस्कृतिक विभागाच्या वतीने चळवळीचे गीते सादर करण्यात आली. त्यानंतर रमाईचा संघर्ष हे नाटक शोभा पाटील आणि इंजी. गौतम पाटील यांनी प्रस्तुत केले. त्यानंतर लगेच 'जोतिबाचा संघर्ष' हे प्रबोधनात्मक नाटक सादर करण्यात आले. या नाटकातून समाजातील अंधश्रद्धा, अज्ञान आणि शोषण यावर प्रभावी भाष्य करण्यात आले. या नाटकात रॉकी घुटके, माधुरी मेश्राम, अजय रहाटे, श्वेता गजभिये, चंदा मोटघरे आणि प्रा. माणिकलाल लोणारे यांनी आपल्या अभिनयातून प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी बुवाबाबांच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीवर भाष्य करत जनजागृतीपर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ज्येष्ठ पदाधिकारी डॉ. सुनील भगत, डॉ. विकास होले, उत्तम सालवनकर, विजया श्रीखंडे, देवयानी भगत, मंगला गाणार, सुषमा शेवळे, इंदू उमरे, शीला डोंगरे, प्रीती नगराळे, वंदना मेंढे यांची उपस्थिती लाभली. संचालन इंजी. गौतम पाटील आणि रामभाऊ डोंगरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुभाष कांबळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुभाष शहारे, सुभाष कांबळे, ज्योती फडके, शामल मेंढे, वीणा वानखेडे, अनिकेत खोब्रागडे, राखी गजभिये, कमलेश रंगारी, संगीता चौधरी, छाया गुडघे यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमामुळे समाजात प्रबोधनासोबतच एकात्मतेचा संदेशही दिला गेला.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648